
बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०




साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध




आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक ०३ | बुधवार,दि.२५ डिसेंबर २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


## रक्तपेढीत पुन्हा रक्त तुटवडा..

### तिनचार दिवस पुरेल ऐवढाच साठा, रक्तदानासाठी दात्यांना आवाहन

**गोंदिया :–** दिवाळी, दसरा, विधानसभा निवडणूक, त्यातच आचारसंहिता या धावपळीत रक्तदान शिबिरे झालीच नाहीत. परिणामी जिल्ह्यासह राज्यभर रक्ताची कमतरता जाणवते आहे. गोदियातही हीच स्थिती आहे. रक्तदानच थांबल्यामुळे रक्त पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. दात्यांना रक्तदानासाठी पुढे येण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व बाई गंगाबाई स्त्री रुग्णालय येथे जिल्ह्याच्या सीमावर्ती राज्य मध्यप्रदेश, छत्तीसगडसह सीमावरती जिल्ह्यातील नागरिकही उपचार घेतात. सिकलसेलग्रस्त, प्रसूत महिला व अपघातग्रस्तांना रोज १५ ते २० पिशव्या रक्ताची गरज असते. आजस्थितीत शासकीय रक्तपेढीत तिनचार दिवस पुरेल एवढाच रक्तसाठा आहे.




**रक्तदान करण्यासाठी नागरिकांमध्ये उदासीनता दिसून येत आहे. रक्तदान शिबिराचे आयोजनही कमी झाले आहे. अपघात व विविध जर्जर आजारग्रस्तांना रक्ताची गरज असते. आजस्थितीत शासकीय रक्तपेढीत तीनचार दिवस पुरेल एवढाच रक्तसाठा आहे. सेवाभावी संस्था, राजकीय संस्थांनी रक्तदान शिबिराचे आयोजन करावे, प्रत्येक सुदृढ नागरिकांनी भीती न बाळगता रक्तदान करावे, असे आवाहन शासकीय रक्तपेढीचे प्रभारी जनसंपर्क अधिकारी विजय बिसेन यांनी केली आहे.**

**रक्तदान कमी व रक्ताची मागणी जास्त असल्यामुळे रक्तदान शिबिराची मोठ्या प्रमाणात गरज आहे. जीवन मरणाच्या दारात असलेल्यांना आशेचा किरण दाखविणाऱ्या येथील रक्तपेढीत रक्ताचा पुरवठा व्हावा यासाठी प्रत्येक सुदृढ नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करण्याची गरज आहे.**
**डॉ. पूजा इंगळे, प्रा. शासकीय नर्ससिंग कॉलेज, गोंदिया**

लोकसभा निवडणुकीनंतर पावसाळा आणि त्यानंतर विधानसभा निवडणुकीची धुमाळी, आचारसंहितेचा परिणाम रक्त संकलनावर झाला आहे. तेव्हापासून सुरू झालेला रक्ताचा तुटवडा आजपर्यंत भरून निघालेला नाही. आचारसंहितेमुळे कार्यक्रमांवर बंदी होती. राजकीय पुढारींचे वाढदिवस, संत, महापुरुषांची जयंती, पुण्यातिथी व उत्सवानिमित्त घेतली जाणारी रक्तदान शिबिरे ठप्प झालीत. या फटक्यातून रक्तपेढ्या अजूनही सावरलेल्या नाहीत. गोंदियातील एकमेव शासकीय रक्तपेढीसह खाजगी रक्तपेढ्यांमध्येही रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. अपघातातील गंभीर रुग्ण, शस्त्रक्रिया करून घेणारे रुग्ण, ॲनिमियाग्रस्त गरोदर व प्रसुत महिला, सिकलसेलग्रस्त रुग्णांना नियमित रक्त द्यावे लागते. वेळेवर आणि पुरेसे रक्त पुरवताना रक्तपेढ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. जानेवारी, मे महिन्यानंतर आता पुन्हा रक्त तुडवडा निर्माण झाला आहे. रक्ताचा पुरवठाच नसल्याने रक्तपेढ्यांसमोर मोठी समस्या उभी ठाकली आहे. या परिस्थितीत समाजातील सर्वच घटक, सेवाभावी संस्थांना रक्तदानाचे आवाहन करण्यात आले आहे.

## नापास विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात बढती बंद,केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली(वृत्तसंस्था)–** शिक्षण क्षेत्रात टीकेचा विषय ठरलेला पाचवी ते आठवीतील विद्यार्थ्यांना सरसकट उत्तीर्ण करून पुढच्या इयत्तेत प्रवेश देण्याचं धोरण केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने अखेर रद्द केलं आहे.केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नो डिटेंशन पॉलिसी संपुष्टत आणली आहे. त्यामुळे आता पाचवी ते आठवीच्या वार्षिक परीक्षेत नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुतीर्ण करण्यात येणार आहे. तसेच या विद्यार्थ्यांना दोन महिन्यांच्या आत पुन्हा परीक्षा देता येणार आहे. मात्र पुन्हा अनुतीर्ण झाल्यास या विद्यार्थ्यांना पुढच्या इयत्तेत प्रवेश मिळणार नाही. तसेच कुठल्याही शाळेला इयत्ता आठवीपर्यंतच्या कुठल्याही विद्यार्थ्याला शाळेतून काढून टाकता येणार नाही.




सोमवारी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नो डिटेंशन पॉलिसी संपुष्टत आणत दीर्घकाळापासून सुरू असलेली व्यवस्था बदलली आहे. या निर्णयामुळे आता पाचवी ते आठवीच्या वार्षिक परीक्षेत अनुतीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना नापास केलं जाणार आहे. मुलांमधील शिकण्याची क्षमता सुधारणे आणि शैक्षणिक कामगिरी उंचावणे हे हा निर्णय घेण्यामागचं महत्त्वाचं उद्दिष्ट असल्याचं सरकारने सांगितले आहे.

आता नव्या व्यवस्थेनुसार अनुतीर्ण विद्यार्थ्यांना दोन महिन्यांच्या आत पुन्हा परीक्षा देण्याची संधी मिळेल. मात्र जर त्या परीक्षेत पुन्हा नापास झाल्यास अशा विद्यार्थ्यांना पुढच्या इयत्तेत प्रवेश मिळणार नाही. मात्र इयत्ता आठवीपर्यंत कुठल्याही विद्यार्थ्याला आठवीपर्यंत शाळेतून काढून टाकता येणार नाही, असेही सरकारने स्पष्ट केले आहे.

तर, २०१९ मध्ये शिक्षण हक्क कायद्यात (ठढए) सुधारणा केल्यानंतर, १६ राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशांनी या दोन वर्गांसाठी “नो–डिटेंशन पॉलिसी’ आधीच रद्द केली आहे. आता केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे धोरण संपल्यानंतर पाचवी आणि आठवीमध्ये एखादा विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास त्याला दोन महिन्यांत परीक्षा उत्तीर्ण करावी लागणार आहे. जर विद्यार्थी परीक्षेत यशस्वी झाला नाही, तर त्याला पुढील वर्गात प्रमोट केले जाणार नाही.

शिक्षण मंत्रालयाचे सचिव संजय कुमार यांनी सांगितले की, मुलांमधील शिकण्याच्या क्षमतेमध्ये होत असलेली घसरण थांबवण्यासाठी हे पाऊल आवश्यक दिसत आहे. मंत्रालयाने विशेष करून पाचवी आणि आठवीवर लक्ष केंद्रित केलं आहे. त्याचं कारण पायाभूत शिक्षणाच्या दृष्टीने हे वर्ग महत्त्वाचे मानले जातात. या नव्या धोरणामधून विद्यार्थी आणि शिक्षकांना अभ्यासाप्रति अधिक जबाबदार बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## ग्राहकांनी आपले अधिकार व हक्काबाबत नेहमी जागरुक राहावे– अतुल अळशी

**गोंदिया, दि.२४ :** बाजारातून कोणतीही वस्तु खरेदी करतांना आपली फसवणूक होऊ नये म्हणून ग्राहकांनी आपले अधिकार व हक्काबाबत नेहमी जागरुक राहावे, असे प्रतिपादन जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे सचिव अतुल अळशी यांनी केले. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाद्वारे २४ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित राष्ट्रीय ग्राहक दिफ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी सतीश अगडे, सहायक मोटर वाहन निरीक्षक स्वप्नील कुरसूंगे, सहायक जिल्हा माहिती अधिकारी कैलाश गजभिये, ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष नारायण बावणकर, अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे संघटक योगेश्वर सोनुले, जिल्हा ग्राहक तक्रार मंचच्या संघटिका शारदा सोनकवरे व अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे सचिव संजीव बापट मंचावर उपस्थित होते.अतुल अळशी पुढे म्हणाले, ग्राहक म्हणून आपले अधिकार आणि हक्क याबाबत जागरुक व्हा अशी संकल्पना आहे. ग्राहकांची फसवणूक होऊ नये म्हणून ग्राहकांच्या हिताकरीता ग्राहक संरक्षण कायदा २०१९ तयार करण्यात आलेला आहे, त्याचे पालन करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकांची आहे. नागरिकांनी कोणताही व्यवहार करतांना किंवा सेवा घेतांना बिले, विमा पॉलीसी संबंधी असल्यास मुळ पॉलीसी घेणे आवश्यक आहे. जेणेकरुन आपली फसवणूक झाल्यास संबंधीत प्राधिकरणाविरुध्द तक्रार दाखल करणे नागरिकांना सोईचे होईल. जिल्हा ग्राहक आयोगामध्ये ग्राहकांच्या तक्रारींचा निपटारा अतिशय जलद गतीने केला जातो.

२०१९ च्या नवीन सुधारीत कायदयाच्या तरतुदीत भर पडल्यामुळे आता प्रकरणामधील वादाचा निपटारा जलद गतीने मध्यस्थी कक्षाचे मार्गाने करण्याचे प्रावधान आहे. बाजारातून कोणतीही वस्तू खरेदी करतांना ग्राहकांनी दुकानदाराला बील मागणे हे आपले कर्तव्य आहे.

## राज्यातील ३६ पैकी १२ जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदांसाठी चुरस



**मुंबई :** नागपूरच्या अधिवेशनाचे सूप वाजले आणि महायुती सरकारने खातेवाटप जाहीर केले. पाठोपाठ मंत्र्यांना बंगल्यांचे आणि मंत्रालयातील दालनांचे वाटप झाले. पण कोणत्या जिल्ह्याचे पालकमंत्री कोण होणार हा प्रश्न अद्याप अनुत्तरीत आहे.महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांचे पालकमंत्री कधी जाहीर होणार हा प्रश्न सरकारचे राजकीय विरोधक विचारू लागले आहेत. अर्थपूर्ण हितसंबंध जपण्यासाठी काही मंत्री विशिष्ट जिल्ह्यांचे पालकमंत्रिपद मागत असल्याचा आरोपही विरोधकांकडून सुरू झाला आहे. ही आरोपांची राळ उडाली असली तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्र्यांशी संबंधित मुद्यावर योग्य वेळी निर्णय कळेल, असे संकेत दिले आहेत. राज्यातील ३६ पैकी १२ जिल्ह्यांचे पालकमंत्री हे पद मिळवण्यासाठी मंत्र्यांमध्ये स्पर्धा असल्याचे वृत्त आहे. यामुळे नाशिक, जळगाव, रायगड, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, संभाजीनगर, बीड, पुणे, कोल्हापूर आणि गडचिरोली या १२ जिल्ह्यांमध्ये कोण पालकमंत्री होणार याबाबत राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

## नगारजी मस्के यांचे मृत्यूपश्चात नेत्रदान



**भंडारा :** येथील देशबंधू वॉर्ड, निवासी माजी सहायक पोलिस उपनिरीक्षक नगारजी नारायण मस्के (वय ८५) यांचे मंगळवारी (ता. २४) निधन झाले. त्यांच्या इच्छेनुसार मृत्यूपश्चात नेत्रदान करण्यात आले. त्यानंतर दुपारी त्यांच्या पार्थिवावर वैनगंगा नदीकाठी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.ते पत्रकार राजू मस्के यांचे वडील होते. त्यांच्या मागे पत्नी, तीन मुली, दोन मुले, नातवंडे व बराच मोठा आप्तपरिवार आहे.

## एकाच शिक्षकावर चार वर्गाचा भार!

### जि.प.च्या ९७ शाळांमधील चित्र, कसे घडणार विद्यार्थी?


**गोंदिया:–** खासगी शाळांच्या तुलनेत जिल्हा परिषदेच्या शाळा कुठेही मागे राहू नयेत, यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. पण मागील तीन–चार वर्षापासून जि.प. शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. परिणामी जिल्ह्यातील ९७ शाळांमध्ये प्रत्येकी एकच शिक्षक कार्यरत असून त्याच्यावर चार वर्गाचा भार असल्याचे चित्र आहे. त्यामुळे या शाळांमध्ये विद्यार्थी घडणार तरी कसे? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या एकूण १६४५ शाळा असून यापैकी इयत्ता पहिली ते चौथीच्या एकूण ९७ शाळांमध्ये प्रत्येकी एकच शिक्षक नियुक्त आहे. त्यामुळे या चार वर्गाच्या विद्यार्थ्यांना एकत्रित बसवून धडे देण्याची वेळ शिक्षकांवर आली आहे. विशेष म्हणजे शिक्षकांची पदे रिक्त असलेल्या शाळा या दुर्गम भागातील आहे. मागील तीन–चार वर्षापासून ही रिक्त पदे भरण्यासाठी जिल्हा परिषदेने पावचे उचलून देखील शासनाने ती न भरल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. ९७ एकशिक्षकी शाळांमध्ये

### ८६ हजार विद्यार्थी घेतात शिक्षण

**जिल्हा परिषदेच्या जिल्ह्यात एकूण १०६९ शाळा असून या शाळांमध्ये ८६ हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. शिक्षण विभागात एकूण ३८७४ पदे मंजूर असून यापैकी ३३५७ पदे भरली आहेत. तर ५१७ पदे अद्यापही रिक्त आहेत.**

अर्जुनी मोरगाव तालुक्यातील ७श देवरी, सालेकसा तालुक्यातील प्रत्येकी १६, आमगाव तालुक्यातील ४, गोरेगाव १३ आणि तिरोडा तालुक्यातील सर्वाधिक २० शाळांचा समावेश आहे. ही पदे रिक्त असल्याने



विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून आता डीएड, बीएड विद्यार्थ्यांना कंत्राटी शिक्षक म्हणून नियुक्त केले जाणार आहे. परंतु सद्यस्थितीत कार्यरत शिक्षकांवरील ताण वाढला आहे.

## झाशीनगर प्रकल्पाच्या पूर्णत्वाकडे लागले डोळे

### महायुती सरकारकडून नागरिकांच्या वाढल्या अपेक्षा, १४ कोटींचा प्रकल्प आता पोहोचला १२७ कोटींवर

**गोंदिया:** अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सिंचन आणि पिण्याच्या पाण्यासाठी अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या झाशीनगर उपसा सिंचन योजनेला १९९६ मध्ये मंजूरी मिळाली. त्यावेळी प्रकल्पाची किंमत १४.४३ कोटी होती. मात्र प्रकल्प रखडल्याने आजघडीला हा प्रकल्प १२७ कोटींवर पोहोचला. तब्बल २७ वर्षे लोटल्यानंतरही प्रकल्प अद्यापही पूर्ण क्षमतने पूर्ण झालेला नाही. मध्यंतरी महायुती सरकारच्या काळात प्रकल्पाकडे विशेष लक्ष देण्यात आले. मात्र प्रकल्प पूर्ण झाला नाही. आता पुन्हा राज्यात सरकार आल्यामुळे आतातरी प्रकल्प पूर्ण होणार काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यात मध्यम प्रकल्प विभागामार्फत बांधण्यात येत असलेल्या झाशीनगर उपसा सिंचन योजनेचे काम १९९६ मध्ये सुरु करण्यात आले. माात्र २७ वर्षे उलटूनही ही योजना पूर्ण झालेली नाही. या योजनेची सुरुवातीची किंमत १४.४३ कोटी रुपये होती ती आता सुमारे १२७ कोटी रुपये झाली आहे.

या योजनेवर आतापर्यंत ८६.४२ कोटी रुपये खर्च झाले आहेत. असे असतानाही अद्याप काम पूर्ण झालेले नाही. या योजनेचे काम सुरु झाल्यानंतर नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पाची घोषणा करण्यात आली.

या प्रकल्पांतर्गत काही भागात करावयाच्या कामाच्या मंजुरीसाठी फाइल वनविभागाकडे पाठविण्यात आल्या आहे. योजनेची एकूण सिंचन क्षमता ४ हजार २२५ हेक्टर आहे. रब्बी हंगामात १५० हेक्टरला पाणीपुरवठा केला जात होता. तो खरीप हंगामात २०० हेक्टरपर्यंत वाढला आहे. या योजनेत १२ गावांचा समावेश आहे.त्यापैकी येरंडी व जब्बारखेडा या दोन गावांना पाणी दिले जात आहे. लवकरच ३०० मीटर पाइप टाकणयाची प्रक्रिया पूर्ण होईल. त्यानंतर पवनी १, पवनी २ आणि जांभडी या आणखी तीन गावांमध्ये पाणी पोहोचेल.

या योजनेचे आतापर्यंत ७० टक्के काम पूर्ण झाल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात येत आहे. मात्र प्रत्यक्षात हा केवळ धूळफेक करण्याचा प्रकार असल्याने नागरिकांचे म्हणणे आहे. शेतकऱ्यांची जमीन घेऊन २७ वर्षे लोटली. बांधकामाचा चेंडू या विभागाकडून त्या विभागाकडे टोलविण्याचे धोरण सुरु आहे. त्यामुळे १४ कोटींचा प्रकल्प १२७ कोटी रुपयांवर जाऊनही अद्याप पूर्णत्वास आला नसल्याने शेतकरी आणि नागरिकांकडून प्रशासन आणि शासनाप्रती रोष व्यक्त करण्यात येत आहे.



### लाभक्षेत्रात या गवांच समावेश

**झाशीनगर उपसा सिंचन योजनेच्या कालाव्याची संपूर्ण लांबी १३.५९ किमी आहे. त्यापैकी तीन किमीचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम वनविभागाच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. ते पूर्ण झाल्यानंतर १२ गावातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. या योजनेच्या लाभक्षेत्रात येरंडी, जब्बारखेडा, पवनी, कोहलगाव, धाबेटेकडी, जाबळी, चुटिया, कान्होली, तिडका, झाशीनगर, येलोडी आणि रामपुरी या गावांचा समावेश आहे.**

## गोंदियात दोन दशकांत २९२ शेतकरी आत्महत्या

**गोंदिया:** सततची नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून दोन दशकांत जिल्ह्यातील २९२ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळल्याची नोंद जिल्हाधिकारी कार्यालयात आहे. या शेतकरी कुटुंबांना शासनाकडून एक लाखापर्यंत मदत दिली जाते.

परंतु, यापैकी केवळ १६९ शेतकरी कुटुंबांनाच मदत देता आली. विविध कारणांनी १२३ शेतकरी कुटुंब अपात्र ठरविण्यात आले. जिल्ह्यातील शेतकरी सातत्याने नवनव्या आव्हानांना तोंड देत आहे. पूर, नापिकी, दुष्काळ, शेतमालाला हमीभाव व बाजारभाव न मिळणे, अशा अनेक कारणांमुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे.

दरम्यान, जिल्ह्यात गतकाळात शेतकरी आत्महत्यांचं प्रमाणही वाढलं आहे. जिल्ह्यात २००५ ते नोव्हेंबर २०२४ या काळात तब्बल २९२ शेतक?यांनी आत्महत्या केली. कुणी गळफास लावला, कुणी विष प्राशन केले, कुणी विहिरीत, तलावात उडी घेतली. नापिकी, निसर्गाचा लहरीपणा, पेरलेले पीक अपेक्षित प्रमाणात घरी न येण्याची शाश्वती, आर्थिक चणचण, बँकेच्या कर्जाचा वाढता डोंगर, कुटंब, मुलाबाळांचे शिक्षण, विवाह, आरोग्याची चिंता शेतकऱ्यांना सतावत असते. अशाच चक्रव्यूहात सापडलेला शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतो.



आत्महत्या हे समस्यांचे समाधान नाही मात्र खचलेला शेतकरी हे धाडस करीत असल्याचे दिसून येते. मागील दोन दशकांत शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्येच्या आकडोवारीवर नजर टाकल्यास २००५ व २०१३ या वर्षात प्रत्येकी ६, २००६ व २०१० मध्ये २२, २००७ मध्ये १९, २००८ व २०१८ मध्ये १८, २००९ मध्ये १२, २०१० मध्ये २२, २०११ मध्ये १३, २०१२ मध्ये १०, २०१४ व २०१८ मध्ये प्रत्येकी १७, २०१५ व २०१६ मध्ये प्रत्येकी ३१, २०१९ मध्ये १०, २०२० मध्ये ८, २०२१ मध्ये १६, २०२२ मध्ये ७, २०२३ या वर्षात ५ व २०२४ या वर्षात नोव्हेंबरपर्यंत ४ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले आहे.

शेतकरी आत्महत्येला अनेक कारणे असली तरी यावर शासनाला अद्यापही ठोस पावले उचलता आली नाहीत. कुटुंबातील कर्ता जर मृत्यूला कवटाळत असेल तर त्याच्या कुटुंबियांवर मोठा आघात होतो. वेळप्रसंगी कुटुंबिय आर्थिक संकटात सापडतात. दरम्यान शासनातर्फे आत्महत्याग्रस्त कुटंबाला १ लाखाची आर्थिक मदत केली जाते. या २० वर्षात शासनाने १६९ पात्र शेतकरी कुटुंबांना १ कोटी ६९ लाखची मदत दिली आहे. सेना–भाजपा युती शासनाने सन १९९६–९७ पासून आत्महत्याग्रस्त कुटुंबाला १ लाखाची मदत सुरू केली. यानंतर कित्येक सरकार आले–गेले मात्र शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर केवळ न केवळ राजकारणच झाले. आजही १ लाखाचीच मदत दिली जाते. यात वाढ करण्याची गरज व्यक्त होत आहे.

## हक्कासाठी लढणाऱ्या विद्यार्थ्यांना शहरी नक्षली ठरवण्याचा प्रयत्न-एनएसयूआय

**नागपूर:–** शिष्यवृत्ती, अधिछात्रवृत्ती, सरकारी नोकऱ्यातील आरक्षण यासाठी सरकारविरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना शहरी नक्षली ठरवण्याचा प्रयत्न होत आहे, असा आरोप स्टुडंट्स युनियन ऑफ इंडियाचे (एनएसयूआय) राष्ट्रीय अध्यक्ष वरुण चौधरी यांनी सोमवारी येथे पत्रकार परिषदेत दिला. एनएसयुआयची राष्ट्रीय प्रशिक्षण कार्यशाळा सेवाग्राम येथे पार पडली. त्यानंतर चौधरी यांनी नागपुरात पत्रकारांशी संवाद साधला.

चौधरी म्हणाले, केंद्र सरकारने शिक्षणातून आरक्षण संपविण्याची सुरुवात केली आहे. २०१३ मध्ये सार्वजनिक क्षेत्रात १३ लाख नोकऱ्या होत्या. २०२३ पर्यंत त्या साडेआठ लाख राहिल्या आहेत. देशातील ४५ केंद्रीय विद्यापीठांमध्ये फक्त दहा टक्केच शिक्षक व प्राध्यापक हे एससी, एसटी व ओबीसीचे आहेत. गेल्या काही वर्षांपासून विद्यार्थ्यांची अधिछात्रवृत्ती व शिष्यवृत्ती अडविली जात आहे. या विरोधात आवाज उठविणाऱ्या विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल केले जात आहेत. त्यांना भीती दाखवण्याचा प्रयत्न होत आहे, असा आरोपही त्यांनी केला. यावेळी एनएसयूआयचे महाराष्ट्र प्रभारी अक्षय क्रांतिवीर, अर्जुन छापराणा उपस्थित होते. सदस्य नोंदणी अभियानास सुरुवात एनएसयूआयतर्फे आजपासून देशभरात सदस्य नोंदणी अभियान सुरू करण्यात आले आहे.

एनएसयुआयने यापूर्वीच “हम बदलेंगे’ असा नारा दिला आहे. आम्ही देशभरातील विद्यापीठांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांचे प्रश्न ऐकून घेणार आहोत व ते सोडविण्यासाठी प्रयत्न करणार आहोत, असेही ते म्हणाले.




### मोदींनी माफी मागावी

**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केला आहे. सरकारचे प्रमुख म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यासाठी माफी मागितली पाहिजे. तसेच सरकारच्या चुकीच्या धोरणाचा विरोध करणाऱ्या विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल करून त्यांना घाबरणे बंद करावे, अन्यथा देशभरातील विद्यार्थी रस्त्यावर उतरून आंदोलन करतील, असा इशारा चौधरी यांनी दिला.**

### चौधरी यांनी केलेले दावे

- **भाजप सरकारच्या खासगीकरणाच्या धोरणामुळे सरकारी नोकऱ्या कमी झाल्या आहेत. २०१३ ध्ये १४ लाख नोक?या होत्या. त्यात घट होवून २०२३ मध्ये ८.४ लाखांवर आल्या आहेत. सरकारी नोकऱ्या घटल्याचा सर्वाधिक फटका अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसी समाजाला बसला आहे.**
- **केंद्रीय विद्यापीठात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसी समाजातील प्राध्यापक संख्या अगदीच बोटावर मोजण्याइतकी आहे. त्या उलट इतर समाजातील प्राध्यापक मोठ्या संख्येने आहे.**
- **२०२४–२५ मध्ये ओबीसी आणि ईबीसी विद्यार्थ्यांसाठीच्या मॅट्रीक पूर्व आणि आणि मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीमध्ये घट करण्यात आली आहे. २०१७ मध्ये नवीन धोरण लागू झाले होते. त्यानुसार ६० लाख अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची पोस्ट मॅट्रीक छात्रवृत्ती बंद करण्यात आली आहे.**

## संपादकीय

# भुजबळांचे तिसरे बंड

भुजबळ म्हणतात – कब तक सहे एक अपमान हम, सुनते सुनते दिल ही थक जाता है, जब वार हो स्वाभीमान पर हर बार, तो सब का अंत हो जाता हैः चूप कर क्या मिलता है आखिर, दिल का दर्द ही चढता है, और फिर उठानी पडती है आवाज, जब पानी सर के उपर चढ जाता हैः

डिसेंबर १९९१. नागपूर येथे राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन चालू होते, तेव्हा काँग्रेसचे सरकार होते. अविभाजित शिवसेनेचे नेते मनोहर जोशी यांची विधानसभेचे विरोधी पक्षनेते म्हणून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी निवड केली, हेच नेमके छगन भुजबळांचे दुखणे होते. त्यांची मानसिकता व अस्वस्थता शरद पवार यांनी नेमकी हेरली व त्यांना शिवसेनेतून बाहेर येण्याचा मार्ग दाखवला. शिवसेनेत आक्रमक काम करूनही आपल्या मनासारखे होत नाही आणि दुसरीकडे शरद पवारांसारखा दिग्गज नेता आपल्या पाठीशी उभा आहे ही भावना भुजबळांमध्ये तीव्र बळावली व त्यांनी शिवसेनाप्रमुखांच्या विरोधातच बंडाचा झेंडा फडकवला. तेव्हा शिवसेनेचा मुंबईत जबरदस्त दबदबा होता. शिवसेनाप्रमुखांना आव्हान देणे सोपे नव्हते. शिवसैनिकांचा रोष काय असतो हे भुजबळांना चांगले ठाऊक होते. पक्षाच्या अठरा आमदारांना आपल्या बंडात बरोबर घेण्याची त्यांची तयारी झाली. (नंतर प्रत्यक्षात बारा आमदार आले) सभागृहातून भुजबळ हे त्यांच्या साथीदार आमदारांसह अचानक बेपत्ता झाले. ते सर्व कुठे गेले याची शोधाशोध सुरू झाली. त्यांच्या बंडाने शिवसेनाप्रमुखही जाम भडकले होते. त्या सर्व बंडखोर आमदारांची नागपूर जवळ असलेल्या पाटबंधारे विभागाच्या अतिथिगृहात व्यवस्था केली होती. तिथे कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तिथे कुणीही पोहोचू शकणार नाही अशी दक्षता घेण्यात आली होती. तिथे भुजबळांसह सर्व अस्वस्थ होते. शिव–सेनेत बंड करून आणि शिवसेनाप्रमुखांना आव्हान देऊन मुंबईत राहणे हे सोपे नाही, हे सर्वांनाच ठाऊक होते. एकदा तरी बाळासाहेबांनी मला छगन म्हणून हाक मारावी असे स्वतः भुजबळ काकुळतीला येऊन सांगत होते, पण शिवसेनाप्रमुखांनी त्यांचा फोनही घेतला नाही आणि त्यांच्याशी शब्दही बोलले नाहीत. मग मात्र काँग्रेस पक्ष आणि शरद पवारांचे छत्र याशिवाय त्यांच्यापुढे कोणताच पर्याय उरला नाही. पुढे शिवसेनाप्रमुखांनी त्यांना लखोबा म्हणून कायमचे संबोधले पण काँग्रेसने मंत्रीपदाच्या मखरात बसवल्यावर भुजबळही शिवसेनाप्रमुखांना टी. बाळू असे उपहासात्मक बोलू लागले. ज्यांनी त्यांना दोन वेळा महापौर, आमदार केले त्यांच्याशीच भुजबळांनी पंगा घेतला. शिवसेनाप्रमुखांना बऱ्याच वर्षांपूर्वीच्या भाषणाबद्दल अटक करण्याचाही आराखडा रचला. ज्यांनी त्यांना मोठे केले, त्यांनाच जेलमध्ये पाठवायला भुजबळ आतुर झाले होते. पण न्यायालयानेच केस पहिल्या फटक्यात फेटाळून लावली.

आज तेहतीस वर्षांनंतर हेच भुजबळ, जहाँ नही चैना, वहाँ नही रहेनाः असा सूर आळवत आहेत. तेव्हा बाळासाहेब ठाकरेंच्या विरोधात आणि आज अजितदादा पवारांच्या विरोधात ते तोफ डागत आहेत. तेव्हा विधानसभेचे विरोधी पक्षनेते पद मिळाले नाही म्हणून आणि आता महायुतीच्या नव्या सरकारमध्ये मंत्रीपद मिळाले नाही म्हणून ते आक्रोश करीत आहेत. तीन दशकांपूर्वी त्यांनी बंड केले तेव्हा शरद पवारांची ताकद त्यांच्या पाठीशी होती. जुलै २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शरद पवारांच्या नेतृत्वालाच त्यांनी आव्हान दिले तेव्हा अजितदादांचे वलय आणि भाजपाचे संरक्षक कवच त्यांच्याबरोबर होते. आता भुजबळांनी अजितदादांच्याच विरोधात बंडाचा झेंडा फडकवला आहे, पण त्यांच्या पाठीशी नेमके कोण आहे, हे गूढ आहे. आपल्याला मंत्री करावे म्हणून स्वतः देवेंद्र फडणवीस आग्रही होते असे ते वारंवार सांगत आहेत. तसेच हम एक है तो सेफ हैः अशी पंतप्रधान नरेंद्र मोदींची निवडणुकीतील आवडती घोषणा देत आहेत. त्यांना भविष्यात कोणाकडून काय किंमत मिळेल हे ठाऊक नाही पण अजितदादांना त्यांनी डोकेदुखी निर्माण केली आहे.

छगन भुजबळ ७७ वर्षांचे आहेत. ते मूळचे नाशिकचे. लहानपणीच आई–वडिलांचे कृपाछत्र गेल्यामुळे ते मुंबईला आले. गेल्या पन्नास वर्षांच्या त्यांच्या राजकीय जीवनातील हे त्यांचे तिसरे बंड आहे. जेव्हा त्यांच्या मनाविरुद्ध घडते किंवा त्यांना पाहिजे ते मिळत नाही, तेव्हा ते समता परिषदेची ढाल पुढे करतात. लहानपणी ते भायखळ्याच्या मंडईत भाजी विकायचे. वीर जिजाबाई टेक्निकल इन्स्टिट्यूटमधून त्यांनी इंजिनीअरिंगचा डिप्लोमा घेतला. तरुण वयात शिवसेनाप्रमुखांची शिवाजी पार्क मैदानावरील भाषणे ऐकून ते प्रभावीत झाले. १९७३ मध्ये ते मुंबई महापालिकेत शिवसेनेचे नगरसेवक झाले तेव्हापासून त्यांनी कधीच मागे वळून बघितले नाही. १९८५ मध्ये ते माझगावमधून आमदार म्हणून निवडून आले. माझगावमधून दोन वेळा आमदार झाले, दोन वेळा महापौर झाले पण बाळासाहेबांनी मनोहर जोशींना विधानसभेचे विरोधी पक्ष नेतेपदी नेमल्याने त्यांचे बिनसले. मग पुढचा प्रवास काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शरद पवार व अजित पवार यांच्यासोबत सुरू झाला.

देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमध्ये ३९ मंत्र्यांचा दि. १५ डिसेंबरला नागपूर अधिवेशनाच्या पूर्व संध्येला शपथविधी झाला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या ९ मंत्र्यांना संधी मिळाली. पण त्यात भुजबळ यांचे नाव नाही, त्यानंतर भुजबळांचा संताप सुरू झाला. शरद पवारांच्या पक्षात छगन भुजबळांना खूप महत्त्व दिले गेले. प्रदेशाध्यक्ष, उपमुख्यमंत्रीपद त्यांना मिळाले. ओबीसी नेता म्हणत ते नेहमीच वलयांकित राहिले. पण मनी लाँड्रिंगच्या आरोपावरून ईडीकडून झालेली चौकशी, दोन वर्षे जेल, शिवाय भ्रष्टाचाराच्या आरोपावरून न्यायालयात सुनावणी चालूच आहे. भुजबळ हे भाजपाच्या रडारावर अनेक वर्षे होते. त्यांचा पुतण्या समीरने बंडखोरी करून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या सुहास कांदे या अधिकृत उमेदवाराच्या विरोधात निवडणूक लढवली तेव्हापासून शिवसेनाही भुजबळांवर नाराज आहे. दोन महिन्यांपूर्वीच त्यांचे चिरंजीव पंकज याची विधान परिषदेवर आमदार म्हणून निवड झाली. स्वतः छगन भुजबळांनी येवल्यातून निवडणूक लढवली. समीरने नांदगावमधून लढवली.

भुजबळांची नाराजी व संताप त्यांच्या समर्थकांमध्ये पोहोचल्यावर त्यांचा राग अजितदादांवर निघाला. काही ठिकाणी तर अजितदादांच्या फोटोला जोडो मारा आंदोलन झाले. मंत्रीपद मिळाले नाही म्हणून असे आंदोलन प्रथमच महाराष्ट्रात बघायला मिळाले. अखेर भुजबळांना सांगावे लागले की, पेटवापेटवी करायची नाही, जोडे मारो करायचे नाही, शिविगाळ करायची नाहीः लाडक्या बहिणींप्रमाणेच महायुतीच्या मोठ्या यशात ओबीसींचा वाटा मोठा आहे, असे भुजबळ आवर्जून सांगत आहेत. मला मंत्रीपदाची हाव नाही, रास्ता मेरा है, मी रस्त्यावर लढाई लढणार, असे ते म्हणत आहेत. कोणाच्या विरोधात व काय पाहिजे म्हणून ते लढणार आहेत?

# अमित शहाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान का केला?

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. आंबेडकरांचा अपमान केला हे सत्तेच आहे. पण त्याचबरोबर त्याने भर सभागृहात एक सत्य सांगितले, त्याकडे या अपमानाचा निषेध करणारांनी पूर्णपणे दुर्लक्ष केले. ते सत्य असे की, जर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा जप केला तर मनुष्य सात जन्म स्वर्गात जातो.

आता स्वर्ग व नर्क या बाबी बुद्धिवंतांच्या मेंदूच्या पलीकडच्या असल्या तरी, हिंदुत्ववाद्यांना त्या प्रिय आहेत. नरकापेक्षा स्वर्गावर त्यांचा जास्त विश्वास आहे. आता तिथे अप्सरा व त्यांचे नाच गाणे असते असे सांगितले गेल्याने किंवा तसे आजपर्यंत भासवले गेल्याने हा विश्वास अधिक दृढ झाला असावा. पण याच्यातली गंमत म्हणजे ३३ कोटी देवांचा जप करून जर हिंदुत्ववाद्यांना स्वर्ग हवा असेल, तर त्यांनी तो नक्कीच तेहतीस कोटी देवांपेक्षा एका देवाचा, म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा नामजप जरूर करावा असे अमित शहाना म्हणावयाचे असावे. पण त्यांनी या सुविचाराला फॅशन म्हटल्याने हा सुविचार कुविचारात परावर्तित झाला आणि अमित शहानी हिंदूत्ववाद्यांना दिलेला सल्ला फसला. पण अजूनही वेळ गेलेली नसून हिंदुत्ववाद्यांनी तो मान्य करावा व डॉ बाबासाहेब आंबेडकर नावाचा जप करून सात जन्म स्वर्ग प्राप्ती करावी असा माझा त्यांना प्रेमाचा सल्ला आहे. कारण डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा जप करायला आम्हा बुद्धीवंतांची कोणतीच हरकत व ना नाही.

आता राहिला प्रश्न अमित शहा सारखा माणूस संविधानिक पदावर बसलेला असतानाही तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भर सभागृहामध्ये अवमान व अपमान जाहीर पद्धतीने का करतो? हा आहे. याचे नेमके कारण असे की, डॉ. आंबेडकरांना जिवंतपणी त्रास देणारे, त्यांना विरोध करणारे हेच परकीय आर्यवंशी आरएसएसचे ब्राह्मण होते. पण त्यांना बाबासाहेब व त्यांचा विचार, नको तेवढा विरोध करूनही जिवंतपणी संपवता आले नाही व आजही त्यांच्या मृत्यूनंतरही संपवता येत नाही हे खरे त्यांचे दुखणे आहे. यासाठी त्यांनी नको त्या क्लुप्त्या बाबासाहेबां विषयी शोधून काढल्या व त्यांचा प्रचार प्रसार समाजामध्ये करूनही पाहिला, पण यात त्यांना नेहमीच अपयश आले. डॉ. आंबेडकरांना संपवण्यासाठी या आरएसएस वाल्यांनी त्यांना दलितांचे कैवारी, दलितांचा महापुरुष म्हणून पहिले, तसेच डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याची विटंबना करून, त्यांच्या जयंतीला विरोध करून पाहिला, त्यांच्या नावावर जातीय दंगली व हिंसाचार करूनही पाहिला. तरीही दिवसेंदिवस डॉ. आंबेडकर या देशाच्या मूळ भारतीय समाजात आपले आदराचे स्थान टिकून ठेवून ते उंचावतच राहिले याचा त्यांना मुळातून राग आहे. पण हा राग नको तेवढा आळवूनही जर बाबासाहेब व त्यांची अस्मिता दिवसेंदिवस वाढतच असेल तर, तिला खंडित करणे व त्यासाठी संविधानिक सभागृहाचा वापर करणे हा एकच पर्याय त्यांच्यापुढे राहिला होता व तो त्यांनी अमित शाहाच्या तोंडून करून पाहिला. पण त्यातही त्यांना अपयशच आले.

तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संविधानिक सभागृहामध्ये अपमान करण्यासाठी मागे आरएसएसचे दुसरेही एक



महत्त्वाचे कारण दडलेले आहे, ते म्हणजे १९२५ ला स्थापन झालेल्या आरएसएसचे २०२५ हे शताब्दी वर्ष आहे. या शताब्दी वर्षात आरएसएसला हिंदुत्वाच्या नावावर आपला ब्राह्मणी अजेंडा वापरून आपले ब्राह्मणीराष्ट्र पुन्हा स्थापित करायचे आहे. म्हणजेच परत पेशवाई आणून संपूर्ण भारताला व भारतीयांना आ–पले राजकीय व सामाजिक गुलाम बनवायचे आहे. कारण भारतीयांना आपल्या अधिपत्याखाली व पारतंत्र्यात ठेवणे ही या परकीय ब्राह्मणांची पूर्वीपासूनची मनोमन अपेक्षा आहे व ती त्यांना या आरएसएसच्या शताब्दी वर्षात पूर्ण करायची आहे. कारण आर्यवंशी ब्राह्मण हे आपल्या भारत देशा–तील पहिले अतिक्रमणकारी व दहशतवादी असतानाही त्यांनी मूळ भारतीयांना जिंकून घेतले व हजारो वर्ष त्यांच्यावर आर्यसम्राट म्हणून राज्य केले. पण ते राज्य इंग्रज राजवटीतल्या शैक्षणिक धोरणाने व वैचारिक प्रबोधनाने पूर्णपणे लयाला गेले. स्वातंत्र्यानंतर पुन्हा आपल्याला आपली ब्राह्मणशाही स्थापता येईल व मूळ भारतीयांवर परत राज्य करता येईल ही अपेक्षा त्यांची भंग पावली आणि याला कारण होते फक्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर.

जर हा उच्चविद्याविभूषित डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाचा माणूस इंग्रज राजवटीत जन्माला आला नसता व कायद्याचा महान पंडित झाला नसता, तर भारताची लोकशाहीवादी राज्यघटना ही मनूवादाला व ब्राह्मणी व्यवस्थेला पोषक पद्धतीची लिहिता आली असती. पण डॉक्टर आंबेडकरांनी भारताची राज्यघटना अशा काही पद्धतीने लिहिली की, त्यामुळे मूळ भारतीयांना त्यांचे न्यायहक्क व अधिकार मिळाले, शिक्षणाचा व आरक्षणाचा अधिकार मिळाला, अन्यायाविरुद्ध बंड करण्याचा अधिकार मिळाला आणि यामुळे हा मूळ भारतीय समाज आज ब्राह्मणांच्या बरोबरीने समाज व्यवस्थेत वागू लागला. म्हणजे जे आपले पूर्वापार व पिढ्यानपिढ्याचे बौद्धिक, सांस्कृतिक, सामाजिक व धार्मिक गुलाम होते, ते आज आपल्या बरोबरीने आले. एवढेच नाही तर आपल्यापेक्षाही बुद्धीने महान व श्रेष्ठ ठरायला लागले. यामुळे आपले या देशाचे सम्राट व मालक बनण्याचे स्वप्न भंगले व आपल्याला स्वातंत्र्यानंतर जी या भारतात पेशवाई आणून, मूळ भारतीयांचे मालक व्हायचे होते, तिथे आपल्याला यांच्या मर्जीतले गुलाम व्हावे लागले. ही ब्राह्मणांची सर्वात मोठी आज शोकांतिका झालेली आहे व या शोकांतिकेला केवळ आणि केवळ कारणीभूत फक्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हेच होत.

तसेच ब्राह्मणी आरएसएस या संघटनेने आपल्या भाजप सरकारकडून २०२५ या आरए–सएस स्थापनेच्या शताब्दी वर्षात भारताची राज्यघटना निकामी करून तेथे मनूस्मृतीचे राज्य स्थापून संपूर्ण मूळभारतीयांना आपले राजकीय गुलाम बनवण्याचे अभिवचन घेतलेले आहे. तसे मूळ भारतीयांना हिंदुत्वाच्या नावाखाली या देशाची डॉ. आंबेडकर प्रणित लोकशाही प्रणाली पूर्णपणे मोडीत काढून, तिथे हिंदुत्वाच्या नावाखा–ली ब्राह्मणी राजवटीची व पेशवाई गुलामीची सुरुवात करण्याचे अभिवचनही घेतलेले आहे. तसेच या ब्राह्मणी पेशवाईच्या गुलामी राजवटीत भारताचे नामकरण हिंदुस्थान असे करायचे असून, या हिंदुस्तानी ब्राह्मणी राज्यात भार–ताचा राष्ट्रीय ध्वज भगवा करायचा आहे. तसेच भारताची राष्ट्रीय भाषा संस्कृत बनवायची आहे आणि भारतीय संसदेच्या लोकसभेची आचार्य सभा बनवायची आहे. याचप्रमाणे या आचार्य सभेची कोणतीही निवडणूक घ्यायची नाही. तर या आचार्य सभेचे सदस्य हे एकदाच निवडले जातील व त्यांना अजीव सदस्य म्हणून मानले जाईल.जर या आचार्य सभेतल्या अजीव सदस्याने राजीनामा दिला किंवा तो मरण पावला तरच ती जागा पुन्हा नव्याने भरण्यात येईल. पण तिची निवडणूक होणार नाही. अशी ब्राह्मणी प्रणित पेशवाई व आपल्या हिताची शासन व्यवस्था त्यांना भारतात आणायची आहे. पण यातला सर्वात मोठा अडचण व गतिरोधक डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत. हे ते पूर्णपणे ओळखून चुकलेल आ–हेत. यामुळे हातातोंडाशी आलेला घास आपल्याला गीळता येतो की नाही, म्हणून ते आता संविधानिक सभागृहामध्ये बाबासाहेबांना बदनाम करण्याचा प्रयत्न कसोशीने करत आहेत.

या अगोदर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना संविधानिक सभागृहाच्या बाहेर बदनाम करण्याचा प्रयत्न करत होते. पण आता त्यांनी आपला मार्ग बदलून संविधानिक पद्धतीचे सभागृही सोडायचे नाही. तर यातूनही बाबासाहेबांची बदनामी करून, मूळ भारतीय जनता बाबासाहेबांच्या विरुद्ध उभी करायची असा त्यांनी चंग बांधलेला आहे.


यासाठी संपूर्ण भारतीय जनता पार्टी व आरएसएस परणित संघटना कामाला लागलेल्या असून, त्यांचे राजकीय पद्धतीचे नेतृत्व अमित शहा नावाचा तडीपार माणूस करत आहे. तसेच त्याला व त्याच्या पक्षाला आपल्याच मूळ भारतीय वंशाचे असणारे काही राजकीय गुलाम नेते हे पाठबळ देत आहेत. त्यांच्याच पाठबळावर हा अमित शहा नावाचा तडीपार गृहमंत्री संविधानिक सभागृहामध्ये डॉ. आंबेडकर या महामानवाचा जाहीर अपमान करत आहे. हे प्रथमतः संविधान प्रेमी, लोकशाही प्रेमी व बुद्धिवंतांनी लक्षात घेतले पाहिजे. पण आज भारतीय जनता भाजपच्या मेंदू हरवलेल्या राजकर्त्यांच्या पाठीशी उभी नाही. तर ती महामानव, प्रज्ञा सूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाठीशी उभी आहे. हे आज दे–शात पसरलेल्या वैचारिक विरोधी परिस्थितीवरून दिसून येते.

**दीपक गायकवाड**

# भाषा शिकायला मिळाली नाही अन् जर्मनीत नोकरीही नाही

## बेरोजगार युवकांचे स्वप्न स्वप्नच राहिले, शासनाकडून मात्र सुचना नाहीत

**गोंदिया:** राज्य शासनाने जर्मनीतील बाडेन–तुटेनबर्ग या राज्यासोबत महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील उप–लब्ध कुशल मनुष्यबळ पुरवण्यासंदर्भात करार केला. त्यासाठी राज्यभरातून अर्ज मागविण्यात आले होते. जिल्ह्यातील ५० जणांची कागदपत्रांसह पडताळणी करुन ते शासनाकडे पाठविण्यात आले होते. मात्र पुढील प्रशिक्षणासंदर्भात अद्याप सुचना प्राप्त न झाल्याने जर्मनीत नोकरी करण्याची इच्छा बाळगून असलेल्या युवक–युव–तींचे स्वप्न स्वप्नच रा–हणार असल्याच दिसून येत आहे.




राज्यात उपलब्ध असलेल्या कुशल मनुष्यबळाचा पुरवठा युरोपीय युनियनमधील देशांना करता यावा, स्थानिकांना रोजगार आणि परकीय चलनवाढीच्या अनुषंगाने हा सामंजस्य करार २५ फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आला होता. मागणीनुसार विविध पदांसाठी राज्यभरातून अर्ज मागविण्यात आले होते. गोंदिया जिल्ह्यातून ५० अर्ज प्राप्त झाले. लाभार्थ्यांची कार्यशाळा घेऊन पुढील कारवाईसाठी प्रकरण राज्य शासनाकडे पाठविण्यात आले. मात्र पाच महिन्यांच काळ उलटून गेल्यानंतरही शासनाकडून जर्मनी भाषा शिकण्याची संधी अन् जर्मनी नोकरी करण्याची संधी मिळाली नसल्याचे दिसून येत आहे.

### जर्मन भाषेसाठी पाच केंद्र होती निश्चित

**जर्मन भाषेचे प्रशिक्षण देण्यासाठी जिल्हा स्तरावर पाच केंद्रे निश्चित करण्यात आली होती. या पाचही केंद्रावर सकाळ अणि रात्री अशा दोन्ही सत्रांमध्ये प्रशिक्षण होणार होते. या प्रशिक्षणाचा सर्व खर्च शासन करणार होते. परंतु कुठे माशी शिंकली आणि कार्यक्रम रखडला हे कळले नाही.**

### ५० युवकांनी केली होती नोंदणी

**परिचारिका, वैद्यकीय सहायक, प्रयोगशाया सहायक, दंतचिकित्सा सहायक, वीजतंत्री,वाहन चालक, सुरक्षा रक्षक, हॉटेल व्यवस्थापक, स्वयंपाकी, रंगारी, केअर टेकर आदि ३० प्रकारच्या विषयांमध्ये कौशल्य प्राप्त असलेल्या आणि जर्मनीमध्ये काम करण्यास इच्छुक असलेल्या युवक–युवतींना शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या लिंकवर नोंदणी केली होती. नोंदणी केलेल्यांना जिल्हास्तरावर जर्मन भाषेचे प्रशिक्षण दिले जाणार होते.**

### शिक्षकांनाही मिळणार होते, जर्मन भाषेचे प्रशिक्षण

**प्रशिक्षणासाठी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून काम करण्याची इच्छा असल्यास शासकीय आणि खासगी अनुदानित शाळेतील शिक्षकांनाही जर्मन भाषेचे प्रशिक्षण दिले जाणार होते. पण तेही थांबले आहे. हे प्रशिक्षण शासनाने ताताडीने सुरु करण्याची मागणी या प्रशिक्षणासाठी नोंदणी केलेल्या युवक–युवतींनी केली आहे.**

# ६५ कोटी रखडून संस्थाचालक जाणार न्यायालयात



**गोंदिया:** आर्थिक दृष्ट्या दुर्बल ठढए घटकातील पालकांच्या पाल्यांना नामांकीत इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये आरटीई अंतर्गत २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश दिला जातो. या पाल्याचे शैक्षणिक शुल्क शासन शैक्षणिक संस्थांना देते. मात्र शासनाने अनेक शाळांचे प्रतीपूर्ती अनुदान न दिल्याने या शैक्षणिक संस्था आर्थिक संकटात सापडल्या आहेत सन २०१२–१३ ते २०२३–२४ या वर्षातील तब्बल ६५ कोटी रुपये शासनाकडे रखडून असून शासन धोरणाविरोधात संस्थाचालक न्यायालयात दाद मागणार असल्याचे आरटीई फाऊंडेशनचे जिल्हाध्यक्ष प्रा. आर. डी. कटरे यांनी स्थानिक लिटल वूड इंग्लिश स्कूल येथे रविवारी जिल्ह्यतील खासगी शाळांच्या संस्थाचालकांच्या बैठकीत सांगीतले. सभेला चेतन बजाज, पालिवाल, जु–नेजा, अग्रवाल, चव्हाण, जितेंद्र लिल्हा–रे, येळे यांच्यासह इंग्रजी माध्यमचे संस्था संचालक उपस्थित होते.

गोंदिया RTE जिल्ह्यात १२६ इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत. आरटीई अंतर्गत विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देतात. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात खटला दाखल केलेल्या गोंदिया जिल्ह्यातील पाच शाळांचे आरटीई प्रतिपूर्तीचे १ कोटी ६३ लाख ५ हजार ४८ रुपये शिक्षण विभागाला सहा आठवड्यात शाळांना देण्याचे आदेश दिले. पाच शाळांव्यतिरिक्त इतर खाजगी कायम विनाअनुदानित व स्वयं अर्थसाहायित तत्वावर सुरु असलेल्या शाळा आरटीई प्रतिपूर्ती संदर्भात न्यायालयात खटला सादर करणार आहेत. महाराष्ट्र शासनाच्या आरटीई नियमानुसार आरटीईची प्रतिपूर्ती पहिला हप्ता ऑक्टोबर तर दुसरा हप्ता एप्रिल महिन्यात देण्याचे आदेश असल्याची माहिती यावेळी संस्थाचालकांनी दिली. असे असूनही वर्षानुवर्षे प्रतिपूर्ती अनुदान थकीत असल्याने या शाळा आर्थिक संकटात सापडल्या आहेत.

# आंदोलकावर लावलेले गुन्हे मागे घ्या

## सर्व समाज संघटना, उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले निवेदन



**गोंदिया:** परभणी येथे पुकारण्यात आलेल्या बंदअंतर्गत पोलिसांनी आंदोलकांवर विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल केले असून ते मागे घेण्यात यावेत, अशी मागणी सर्व समाज एकता संघटनेने केली आहे. यासाठी संघटनेच्यावतीने उपवभिगीय अधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींच्या नावाने निवेदन देण्यात आले.

राज्यातील परभणी येथे १० डिसेंबर रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर स्थित संविधानाच्या प्रतिकृतीला अपमानित करुन काही अज्ञात लोकांनी तोडफोड केली. या विरोधात आंबेडकरवादी संघटना व बहुजन समाजाने ११ डिसेंबर रोजी परभणी बंद करुन आंदोलन करीत आरोपींना पकडण्याची मागणी कीली होती. मात्र पोलिसांनी आंदोलकांवर लाठीचार्य केला.

शिवाय सोमनाथ सूर्यवंशी नामक विद्यार्थ्याला बेदम मारपीट केल्याने त्याचा १५ डिसेंबर रोजी मृत्यू झाला. १६ डिसेंबर रोजी उत्तरीत तपासणीत पोलिसांच्या अत्याधिक मारहाणित सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू झाल्याचे उघड झाले. अशात मृत सोमनाथच्या कुटुंबातील एकाला शासकीय नोकरी व ५० लाख रुपये भरपाई द्यावी तसेच पोलिसांच्या मारहाणीत जखमी आंदोलकांना योग्य ती भरपाई द्यावी, संविधानाचा अपमान करणाऱ्यांना शोधून त्यांना तुरुंगात टाकावे व निर्दोष आंदोलकांवर विविध कलमांतर्गत लावण्यात आलेले गुन्हे मागे घ्यावेत अशी मागणी सर्व समाज एकता संघटनेने निवेदनातून केली आहे. निवेदन देताना खेमेंद्र कटरे, सविता बेदरकर, शिव नागपुरे, कैलास भेलावे, सुनील भोंगाडे, मालती किन्नाके, राजेश वैद्य, रवी भांडारकर, धन्नू भुरले अक्षय डोंगरे, शालू कृपाले, सुनीता वैद्य यांच्यासह अन्य संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत)**

# संविधानाची अवमानना व केंद्रीय गृहमंत्र्यांच्या वक्तव्याचा निषेध

**गोंदिया** : मागील काही दिवसांपासून परभणी येथील घटनेचे तिव्र पडसात पडू लागले आहेत. अशातच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल केलेले अपमानजनक वक्तव्याचा निषेध नोंदविण्यात आला. दरम्यान स्थानिक प्रशासकीय इमारती सम ोर विविध सामाजिक संघटनेच्या वतीने तसेच तालुकास्तरावर जनक्रोश आंदोलन करण्यात आले.

पुरोगामी महाराष्ट्राला कलंक लावणाऱ्या घटना घडत आहेत. परभणी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची विटंबना करण्यात आली तसेच त्यानंतर झालेल्या हिंसाचारात पोलिस कोठडीत असलेल्या सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू झाला. तसेच अनेक आंबेकरी अनुयायांवर गुन्हे दाखल करण्यात आले. तर दुसरीकडे याच प्रकरणावरून संसदेत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या एकेरी उल्लेख करीत त्यांना घेण्यापेक्षा ऐवढ्या वेळ भगव–ानाचे नाव घेण्याचे बोलून त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराची किंबहुना संविधाची चेष्ठा करण्याचा प्रकार केला. त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी तसेच संविधानाची रक्षा करून देश संरक्षित ठेवण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. स्थानिक प्रशासकीय इमार–तीसमोर सर्वसमाज विचार मंचच्या वतिने जनाक्रोश आंदोलन करण्यात आले. तर दुसरीकडे सडक अर्जुनी तालुक्यात ओबीसी संघर्ष कृती समितीच्या वतीने आंदोलन करून तह–सीलदार मार्फत यंत्रणेला निवेदन सादर करण्यात आले.

गोंदिया येथील जनाक्रोश आंदोलन दरम्यान केंद्रीय गृहमंत्र्यावर कारवाई करण्यात यावी, परभणी येथील संबंधित पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा, सुरू असलेला कोबिंग ऑपरेशन थांबविण्यात यावा, मानवाधिकार आयोगाकडून स्वतंत्र तपास करण्यात यावा, उत्तरीय तप–ासणीचा अहवाल अनुसूचित जाती व जनजाती आयोगाला देण्यात यावा तसेच बिड जिल्ह्या–तील मत्सजोग येथील सरपंच हत्याकांडातील दोषीवर कारवाई करण्यात यावी शिवाय विरोधी कृत्य थांबविण्यात यावे तसेच अनुसूचित जाती, जनजाती, अन्न पिछडा वर्ग व अल्पसंख्यकावर होणारे अन्याय थांबविण्यात यावे, अशा मागणीचे निवेदन देण्यात आले.



### आंदोलनात अनेक संघटनांचा सहभाग

**आज स्थानिक प्रशासकीय इमारतीसमोर झालेल्या जनाक्रोश आंदोलनात शिव, फुले, शाहू, आंबेडकरी सर्वसमाज विचार मंच, संविधान मैत्री संघ, ओबीसी संघर्ष कृती समिती, ओबीसी सेवा संघ, ओबीसी अधिकार मंच, संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघ, युवा बहुजन मंच, समता सैनिक दल, भारत मुक्ती मोर्चा, स्टूडेंट राइट्स असोसिएशन, युवा ग्रेज्यूएट फोरम, नेशनल आदिवासी पीपल्स फेडरेशन, ज्येष्ठ नागरिक मित्र मंडळ, संघर्ष वाहिनी, अवामे मुस्लिम संगठन गोंदिया, अन्याय निवारण मंच, संथागार परिवार, भीमघाट स्मारक समिती आदी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.**

**उपस्थितांमध्ये प्रामुख्याने संयोजक अतुल सतदेवे, सी.पी.बिसेन, वसंत गवळी, खेमेंद्र कटरे, यशवंत रामटेके, एड. वीरेंद्र जायसवाल, महेंद्र बिसेन, सुनील भोंगाडे, पप्पू पटले, मनोज मेश्राम, अफजल शाह कमर अली, मोहसीन खान, राजेश नागरिकर, पौर्णिमा नागदेवे, वैशाली कांबळे, प्रियंका गणवीर, नीलकंठ चीचाम, एड. नरेश शेंडे, चुनीलाल राऊत, नरेंद्र वाघमारे, सुनील भालेराव, सुशीला भालेराव दिनेश गेडाम, विलास राऊत, सतीश बनसोड, मिलिंद गणवीर, हौसलाल रहांगडाले, परेश दुरुगवार, दिनेश उके,धीरज मेश्राम, प्रदीप ठवरे,यशपाल डोंगरे, नागरत्न बंसोड, विनोद नांदुरकर आदी अन्य मोठ्या संख्येने शामील होते.**

### वाचन संस्कृतीच्या संवर्धनासाठी वाचन प्रेरणा दिवस उपक्रमाचे आयोजन

**भंडारा दि. २४ :** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विद्यापीठे, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये विदयार्थ्यांसाठी ङ्गवाचन संकल्प महाराष्ट्राचाङ्ग हा उपक्रम दरवर्षी दि. ०१ ते १५ जानेवारी या कालावधीत राबविणे बाबत संदर्भाकिंत शासन परिपत्रक निर्गमित झाले आहे.

सदर उपक्रमासाठी राज्य, विभाग व जिल्हास्तरीय समित्यांची संदर्भाकिंत परिपत्रकान्वये रचना करण्यात आली आहे. ङ्गवाचन संकल्प महाराष्ट्राचाङ्ग हा उपक्रम राबविण्याकरिता कार्यक्रमाचे वेळापत्रक संदर्भाकिंत शासन परिपत्रक सोबत जोडलेल्या विवरणपत्राप्रमाणे असेल. ङ्गवाचन संकल्प महाराष्ट्राचाङ्ग या वाचन पंधरवडानिमित्त सामूहिक वाचन, वाचन कौशल्य, कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परिक्षण व कथन स्पर्धा, ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन व सदर कालावधीत अधिकाधिक विद्यार्थ्यांची सभासद नोंदणी यासारख्या उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत तसेच या व्यतिरिक्त अभिनव उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत निर्देश आहेत.

# शासनाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करा-जिल्हाधिकारी प्रजित नायर

## “सुशासन सप्ताह’ बाबत कार्यशाळेचे आयोजन “प्रशासन गाँव की ओर’ सुशासन सप्ताहाची थीम

**गोंदिया :-** केंद्र व राज्य शासनामार्फत सामान्य नागरिकांच्या कल्याणाकरीता विविध लोककल्याणकारी योजना राबविण्यात येतात. शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची यंत्रणांनी प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी दिले.

“सुशासन सप्ताह’ निमित्ताने आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष यशवंत गणवीर, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अमरीश मोहबे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रमिला जाखलेकर व सामाजिक कार्यकर्त्या रजनी रामटेके मंचावर उपस्थित होते.



“प्रशासन गांव की ओर’ ही सुशासन सप्ताहाची थीम (संकल्पना) आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांसंदर्भात सामान्य नागरिकांना माहिती व्हावी तसेच यासंदर्भात नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी केंद्रीय सार्वजनिक तक्रार निवारण विभागामार्फत सुशासन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहनिमित्ताने जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. जिल्हा प्रशासनामार्फत यासंदर्भात देण्यात आलेल्या निर्देशानुसार १९ ते २४ डिसेंबर २०२४ या कालावधीत सर्व कार्यालयाने सुशासन सप्ताह साजरा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करणे, त्यांना सुलभ सेवा पुरविणे, जिल्हा, उपविभाग, तहसिल स्तरावरील योजनांची कालबद्ध अंमलबजावणी करणे. याबाबत शिबीर आयोजित करण्याचे केंद्रीय विभागाने सुचविले असून जिल्ह्यामध्ये त्याची अंमलबजावणी करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

सदर शिबिरामध्ये नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण, आपले सरकारसह विविध पोर्टलवर प्राप्त तक्रारीचे निराकरण, ऑनलाईन देण्यात येणाऱ्या सेवांचा वेळेत निपटारा करणे, सेवा देण्याकरीता ऑनलाईन प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करणे आदी निर्देश देण्यात आले आहेत. सर्व नागरिकांना पायाभुत सुविधा मिळाल्या पाहिजेत, लोकांना “रोटी-कपडा और मकान’ याबाबत सुविधा देण्यात आल्या पाहिजे. आपल्या विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या शासनाच्या योजनांचा लोकांना लाभ मिळवून देण्यात यावे. तसेच आपल्या कामात सुधारणा करावी, कामात दिरंगाई करु नये, आपल्यावर सोपवलेली जबाबदारी प्रामाणिक व पारदर्शकपणे पार पाडून शासनाच्या योजनांचा लोकांना लाभ मिळवून द्यावा, असे यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांनी “सुशासन सप्ताह’ निमित्ताने तंबाखु व गुटखा खाणाऱ्या व्यक्तींसाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत विशेष मोहिम राबविण्यात येत असून त्याची जनजागृती करण्यात येत आहे असे सांगून जिल्हा परिषदेच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नागरिकांची कामे वेळेवर करण्यात यावे, कामात दिरंगाई करु नये, लोकांची कामे वेळेवर झाली पाहिजेत असे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी “सुशासन सप्ताह’ निमित्त राबविण्यात येत असलेल्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या विस्तार अधिकारी (सांख्यिकी) वैशाली खोब्रागडे यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री आवास, मोदी आवास, रमाई आवास, शबरी आवास, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत, अहिल्याबाई होळकर अवास आदी योजनांबाबत, विस्तार अधिकारी (शिक्षण) पोर्णिमा विश्वकर्मा यांनी जिल्हा परिषद शाळेचे आधुनिकीकरण अंतर्गत डिजिटल करण्यात आलेल्या शाळा व विविध स्पर्धांमध्ये जिल्हास्तरीय व विभागस्तरावर पुरस्काराने सन्मानीत करण्यात आलेल्या शाळा, विभागीय वन अधिकारी तुषार ढमढेरे यांनी वन विभागामार्फत राबविण्यात येत असलेले विविध उपक्रम, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत हत्तीमारे यांनी पोलीस विभागामार्फत दादालोरा खिडकी योजनेंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार माहिती व तंत्रज्ञान विभागाचे जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक फारुख शेख यांनी मानले. कार्यक्रमास विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रावणवाडी ते चांदसूरज रस्ता बांधकामासाठी राज्य सरकार निधीची तरतूद करणार काय?

**आमगांव:-** आमगाव विधानसभा मतदारसंघात मागील दहा वर्षांत आमगाव देवरी राष्ट्रीय महामार्ग वगळता कोणत्याही प्रमुख रस्त्यांची पुनर्बांधणी झाली नाही. परिणामी सर्वत्र रस्त्यांची दुरवस्था झाली आहे.रस्त्यावरील खड्यांमुळे अनेकांना अपघातात प्राण गमवावे लागले आहे. पक्के रस्ते तयार करण्यासाठी क्षेत्रातील नागरिकांकडून सातत्याने मागणी केली जात आहे. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात पहिल्याच दिवशी शासनाने रस्ते विकासासाठी दीड हजार कोटी रुपयांची तरतूद केली. यात होम प्रोजेक्ट अंतर्गत मंजूर रावणवाडी-आमगाव- सालेकसा दरेकसा चांदसूरज मार्गासाठी निधी मिळेल काय असा सवाल केला जात आहे.

रावणवाडी-आमगाव-सालेकसा चांदसूरज मार्गाची पुनर्बांधणी शासनाच्या रस्ते वाहतूक विभागाच्या हेम प्रोजेक्ट (हायब्रीड एनुविटी मोडेल बेस्ड रोड प्रोजेक्ट) अंतर्गत करण्यात येणार आहे. यासाठी लवकरच प्रक्रिया सुरु होईल असे आमदार विनोद अग्रवाल यांनी सालेकसा येथील रस्ते संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांना सांगितले होते. काही महिन्यांपूर्वी या मार्गाचा सव्र्हे करण्यात आल्याची माहिती आहे. परंतु त्यानंतर लोकसभा मग विधानसभा निवडणुकीमुळे बराच कालावधी निघून गेला. यानंतर कुठल्याही हालचाली दिसून आल्या नाही. हा मार्ग हेम प्रोजेक्ट अंतर्गत आहे ही बाब वारंवार सार्वजनिक बांधकाम विभाग पण सांगत आहे. याचा डीपीआर सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार करून दिला आहे. हेम प्रोजेक्ट अंतर्गत मार्ग तयार करण्यासाठी एमएसआरडीसी मंजुरी लागते. सध्या नागपूरला हिवाळी अधिवेशन सुरू असून, त्यात सरकारने पहिल्याच दिवशी पुरवणी मागण्यात ३५ हजार कोटी मागण्या मान्य केल्या. यात राज्याच्या रस्ते व पुलाकरिता १५०० कोटी रुपये मंजूर करण्यात आले. यातून या मार्गासाठी निधी मिळाल्यास या मार्गाची समस्या दूर होईल.

**रस्ता बांधकामासाठी ३५० कोटी रुपयांची गरज**

हेम प्रोजेक्ट अंतर्गत रस्ते विकासासाठी एकूण लागणाऱ्या खर्चाचा ४० टक्के निधी केंद्राकडून दिला जातो. रावणवाडी-आमगाव-सालेकसा-चांदसुरज रस्ता बांधकामासाठी ३५० कोटी रुपयांची गरज आहे. यापैकी ६० टक्के निधी राज्य सरकारने दिले या रस्त्याचे काम मार्गी लागेल. यासाठी स्थानिक लोक-प्रतिनिधींनी पाठपुरावा करण्याची गरज आहे.

**रस्त्याचे काम सुरु होईपर्यंत खड़े बुजवा**

हा रस्ता बांधकाम हेम प्रोजेक्टमध्ये घेतला असून, त्यात रस्ता बांधकामासाठी सर्वेक्षणाचे काम पूर्ण होताच सरकारकडून मार्गासाठी निधी उपलब्ध होईल. या मार्गावर डांबरीकरण आणि जिथे आवश्यक असेल तिथे सिमेंटीकरण सुद्धा केले जाईल. यासाठी जवळपास ३०० ते ३५० कोटी रुपये निधीची गरज आहे. रस्त्याचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत संबंधित विभागाने या रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम सुरू करण्याची मागणी सालेकसा येथील रस्ता संघर्ष समितीने केली आहे.


## कार्यालय ग्राम पंचायत उमरी
### पंचायत समिती गोंदिया, जि.प, गोंदिया

दिनांक :- २४/१२/२०२४

**निविदा सूचना**

ग्राम पंचायत कार्यालय उमरी येथील १५ वा वित्त आयोग निधीचे ( ग्रा.प. स्तर) कामाकरिता लागणारे साहित्य मागविण्या करिता लिफाफा बंद ऑफ लाईन पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. ग्रामपंचायत उमरी येथील सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात हात पंपा वर दुहेरी सौर उर्जावर चालणारा पंप करिता लिफाफ्फा बंद ऑफ लाईन पध्दतीने निविदा दिनांक २५/१२/२०२४ ते ०१/०१/२०२५ या कालावधीत मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुक पुरवठादारांनी ग्राम पंचायत कार्यालय उमरी येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधून निविदा सादर करावी निविदेसंदर्भातील अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर बघावयास मिळतील निविदा स्विकारण व रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहे.

**सरपंच** ग्राम पंचायत कार्यालय उमरी — **ग्रामसेवक** ग्राम पंचायत कार्यालय उमरी


# जिल्ह्यात होणार पुन्हा स्वच्छतेचा जागर!

## संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सन २०२४-२५ ला सुरुवात

**गोंदियाः-** ग्रामीण भागातील जनतेचे आरोग्यमान, जीवनस्तर उंचावण्यासाठी राज्य शासनाकडून विविध अभियान राबविण्यात येतात. परिसर स्वच्छता व नागरिकांच्या सक्रीय सहभागातून संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान पुन्हा अधिक जोमाने राबविण्यात येणार असून सन २०२४-२५ या वर्षासाठी ११ ऑक्टोबरपासून या अभियानाची सुरवात झालेली असून ३० जानेवारी, २०२५ पर्यंत सदर अभियान राबविण्यात येणार आहे. त्यामुळे पुन्हा जिल्ह्यात स्वच्छतेचा जागर होणार आहे.




अभियानाच्या माध्यमातून गावांमध्ये तयार होणाऱ्या स्वच्छतेच्या नव्या सुविधा, नागरिकांचे स्वच्छतेबाबतीत होणारे मतपरिवर्तन व गावागावातून सुरु असलेल्या स्वच्छतेच्या चळवळीत ग्रामीण भागातील सर्व नागरिक, ग्रामस्थांचा सक्रीय व सातत्यपूर्ण सहभाग घेवून त्यांच्या वेगवेगळ्या ग्रामपंचायती, तालुके, व जिल्हयात स्वच्छतेच्या प्रगतिबाबत एक सर्व समावेशक स्पर्धा राबवून व त्या माध्यमातून ग्रामस्थांना प्रोत्साहित करून स्वच्छतेच्या कार्यक्रमाचे महत्त्व पटवून देण्याकरिता जिल्हयात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातून जिल्हयात स्वच्छतेचा जागर करून ग्राम पंचायतीत समाविष्ट गावातील वैयक्तिक शौचालये, त्यांचा वापर, मागणी, हागणदारीमुक्त तपासणीचा अहवाल, त्या अनुषंगाने दुरुस्त करावयाची शौचालये, गावे हागणदारीमुक्त म्हणून घोषित करण्याकरिता करावयाची कार्यवाही व पूर्तता याबाबत ठोस कृती कार्यक्रम आखून १५ नोव्हेंबरपर्यंत ग्रामपंचायतस्तरावर समिती गठण व कृती कार्यक्रम निश्चित करण्यात येणार होता. मात्र विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे सदर कार्यक्रम डिसेंबर महिन्यात करण्यात येत आहे. २१ नोव्हेंबर ते २१ डिसेंबर २०२४ या काळात जिल्हा परिषद गटस्तरावर स्पर्धा व तपासणी करण्यात येणार आहे, २२ डिसेंबर ते ६ जानेवारी २०२५ पर्यंत जिल्हास्तरावरील तपासणी व ७ जानेवारी ते ३० जानेवारी २०२५ पर्यंत विभागीय स्तरावर तपासणी केली जाणार आहे.

**अशी मिळणार वक्षीसे**

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेअंतर्गत ग्रामपंचायतींना जिल्हा परिषद गटस्तरावर प्रथम ६० हजार रुपये, जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकास ६ लाख रुपये, द्वितीय क्रमांकास ४ लाख रुपये, तृतीय क्रमांकास ३ लाख रुपये, विभागस्तरावर प्रथम क्रमांकास १२ लाख रुपये, द्वितीय क्रमांकास ९ लाख रुपये, तृतीय क्रमांकास ७ लाख रुपये, राज्यस्तरावर प्रथम क्रमांकास ५० लाख रुपये, द्वितीय क्रमांकास ३५ लाख रुपये, तृतीय क्रमांकास ३० लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे. स्व. वसंतराव नाईक नाईक पुरस्कार- घनकचरा, सांडपाणी व मैलागाळ व्यवस्थापन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन पुरस्कार तसेच स्व आबासाहेब खेडकर शौचालय व्यवस्थापन पुरस्कारासाठी ग्राम पंचायतीस विशेष पुरस्कार दिला जाणार असून जिल्हा स्तरावर प्रत्येकी ५० हजार रुपये, विभाग स्तरावर ७५ हजार रुपये तर राज्य स्तरावर ३ लाख रुपये देण्यात येणार आहे.

**जिल्ह्यातील ग्राम पंचायतींना मिळणार ४६ लाख ३० हजारांची बक्षीसे**

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत जिल्हयातील ५३ जिल्हा परिषद गटातून प्रथम येणाऱ्या ग्रामपंचायतींना प्रत्येकी ६० हजारांचे असे एकूण ३१ लाख ८० हजारांचे बक्षीस देण्यात येणार आहे, जिल्हा स्तरावर प्रथम आलेल्या ग्रामपंचायतीस ६ लाखांचे, द्वितीय ४ लाख तर तृतीय ३ लाख असे एकूण १३ लाखांचे बक्षीस तर जिल्हा स्तरावर विशेष पुरस्कार म्हणून स्व. वसंतराव नाईक नाईक पुरस्कार- घनकचरा, सांडपाणी व मैलागाळ व्यवस्थापन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन पुरस्कार तसेच स्व. आबासाहेब खेडकर शौचालय व्यवस्थापन पुरस्कारासाठी प्रत्येकी ५० हजार असे तीन ग्रामपंचायतींना एकूण १ लाख ५० हजारांचे बक्षीस मिळून एकूण ४६ लाख ३० हजारांची बक्षीसे ग्रामपंचायतींना मिळणार आहे.

**शाश्वत स्वच्छतेच्या उपक्रमात सहभागी व्हा-जि.प.अध्यक्ष पंकज रहांगडाले**

गावातील शाश्वत स्वच्छतेच्या या उक्रमात सर्व ग्रामपंचायती, नागरिक, गाव व तालुकासतरीय कर्मचारी, अधिकारी तसेच लोकप्रतिनिधी यांनी सक्रीय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी केले आहे.

**अभियानाची प्रभावी अंमलवजावणी करा- मुकाअ मुरुगानंथम**

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सन २०२४-२५ अंतर्गत जिल्हयातील प्रत्येक ग्रामपंचायतीने यात सहभागी होवून अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी, या अभियानाच्या माध्यमातून गावे आदर्श करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांनी केले आहे.

## जिल्हयातील ६४ ग्रामपंचायतींना स्वामित्व योजनेंतर्गत मालमत्ता पत्रकाचे होणार वितरण

**भंडारा दि २४:** राज्य महसूल विभाग, राज्य पंचायत राज विभाग आणि भारतीय सर्वेक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत राज मंत्रालय, भारत सरकार यांचे वतीने स्वामित्व योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेद्वारे भंडारा जिल्ह्यातील ६४ ग्रामपंचायतींना मालमत्ता पत्रकाचे वितरण केले जाणार आहे, अशी माहिती मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, समीर कुर्तकोटी, यांनी दिली.

आता पर्यंत या योजनेंतर्गत राज्यातील ३ लाख १७ हजार गावांमधून ड्रोन सर्वे पूर्ण करण्यात आलेला असून १ लाख १९ हजार गावातून २ कोटी १९ लाख मालमत्ता पत्रक तयार करण्यात महत्वाची प्रगती साध्य केली आहे. स्वामित्व योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांना त्यांच्या निवासी मालमत्तेच्या मालकीबाबत मालमत्ता विषयक कागदपत्र उपलब्ध झाल्याने ग्रामीण क्षेत्रातील लोकांना सक्षम बनविले आहे. याचाच एक भाग म्हणून ता. २७ डिसेंबरला दुपारी १२.३० वाजता पंतप्रधानांच्या हस्ते ५० लाख मालमत्ता पत्रकांचे आभासी वितरण करताना लाभार्थ्यांना संबोधित करणार आहेत.


## ग्राम पंचायत कार्यालय दवडीपार
### पंचायत समिती गोरेगाव जिल्हा परिषद गोंदिया

निविदा सुचना-०१/२०२४-२५/ दि.२३/१२/२०२४

ग्रामपंचायत कार्यालय दवडीपार पंचायत समिती गोरेगाव जिल्हा परिषद गोंदिया हे खालीलप्रमाणे निविदा सार्वजनिक बांधकाम विभाग जि.प.गोंदिया कडे यथायोग्य श्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावारी ऑफलाईन द्विलीफाफा पद्धतीने मागवित आहे. निविदेचा विस्तृत अंदाजपत्रक ग्रामपंचायतीच्या नोटिस बोर्डावर बघायला मिळेल.

| अ.क्र. | योजनेचे व कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम१% | काम करण्याचा कालावधी | कोरी निविदा किंमत (नापरतावा) | कंत्राटदार नोंदणीचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५ व्या वित्त आयोग अंतर्गत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन तसेच स्वच्छतेची कामे करणे | १२००००/- | १२००/- | ६ महिने | ५००/- | यथायोग्य |
| २ | १५ व्या वित्त आयोग अंतर्गत बंधिस्त नाली बांधकाम करणे | २२०२३६/- | २३००/- | ६ महिने | | |
| ३ | १५ व्या वित्त आयोग अंतर्गत सौर उर्जा पंप दुरुस्ती करणे | ३४०२३६/- | ३५००/- | ६ महिने | | |
| ४ | १५ व्या वित्त आयोग अंतर्गत ग्रामपंचायतला लागणारे साहित्य व ग्रा.पं.रंगरंगोटी | १०००००/- | १०००/- | ६ महिने | | |
| ५ | स्वच्छ भारत मिशन व १५ वा वित्त आयोग अंतर्गत सार्वजनिक शौचालय बांधकाम | ३०००००/- | ३०००/- | ६ महिने | ५००/- | |

**ई-निविदा पद्धतीचा तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिद्धी | २३/१२/२०२४ पासून |
| २ | निविदा दाखल करण्याची सुरुवातीची दिनांक | २३/१२/२०२४ पासून |
| ३ | निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | ३०/१२/२०२४ स.१२.०० |
| ४ | निविदा उघडणे | सरपंच/सचिव, ग्रामपंचायत दवडीपार यांचे कक्षात संबंधित निविदाधारकांचे समक्ष दि.३०/१२/२०२४ दु.३.०० वाजता |

**सरपंच** ग्राम पंचायत कार्यालय दवडीपार — **ग्रामसेवक** ग्राम पंचायत कार्यालय दवडीपार

## ग्रामपंचायत कार्यालय मांडोखाल
### तालुका अर्जुनी/मांर. जिल्हा गोंदिया
### निविदा सूचना क्र. १/२०२४-२५ (पहिली वेळ)

ग्रा.पं. मांडोखाल ता.अर्जुनी/मोर. जि. गोंदिया अंतर्गत सन २०२४-२५ या १)१५ वा वित्त आयोग योजनेंतर्गत अ) सेरीकेशन शेड बांधकाम २)१५ वा वित्त आयोग योजनेंतर्गत व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत अ) सार्वजनिक शौचालय बांधकाम-, हे सदर कामे करण्यासाठी ऑफलाईन दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर निविदा केवळ ऑफलाईन पद्धतीने सादर करावयाची असुन निवीदा बाबत इतर सविस्तर माहिती ग्रा.पं. कार्यालय कोरंभीटोला चे सुचना फलकावर उपलब्ध आहे.

**निविदा वेळापत्रक**

| | | | |
|---|---|---|---|
| १) निविदा प्रसिद्धी | २५/१२/२०२४ | ५)निविदा शुल्क व अनामत रक्कम भरणा करणे | ग्रामपंचायत मांडोखाल खाते क्र.97790100015726 बँकेचे नाव-बँक ऑफ बडोदा अर्जुनी/मोर बँकेचे IFSC Code क्र. BARBODBARJN या खात्यावर RTGS/NEFT/Direct Transfer किंवा ग्रामपंचायत मांडोखाल येथे रोखीने भरणा करणे |
| २) निविदा ऑफलाईन भरणा | २५/१२/२०२४ ते ०१/०१/२०२५ सायं. ५.०० वा.पर्यंत | | |
| ३) निविदा उघडणे | ग्रा.पं.मासिक सभेत शक्यतो | | |
| ४) निविदा भरणा पूर्व बैठक | नाही | | |

स्वा/- ग्रामसेवक ग्रा.पं.मांडोखाल — स्वा/- उपसरपंच ग्रा.पं.मांडोखाल — स्वा/- सरपंच ग्रा.पं.मांडोखाल

## कार्यालय ग्राम पंचायत बाराभाटी
### पंचायत समिती अर्जुनी/मोर जिल्हा परिषद गोंदिया
### निविदा सुचना

सर्व इच्छूक कंत्राटदारास सुचित करण्यात येत आहे कि, ग्राम पंचायत बाराभाटी ला खालील विवरण पत्राप्रमाणे संपूर्ण कामाची निविदा प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर कामाकरिता बांधकाम विभागाकडे यथा योग्य श्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून मोहरबंद लिफाफा पद्धतीने निविदा दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फार्मची किंमत | अनामत रक्कम (१%) | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | सांडपाणी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शेग्रीकेशन शेड बांधकाम | १२०००० | ५०० | १२०० | ६ महिने |

१) वरील कामाचे निविदा फॉर्म दिनांक २५/१२/२०२४ ला सकाळी ११.०० वाजे पासून ते दि.०१/०१/२०२५ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्राम पंचायत कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल. २) सदर निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागद पत्रासह वरील नमूद कालावधीत ग्राम पंचायत कार्यालयात स्विकारण्यात येईल. ३) सदर कामाचा तपशिलवार संपूर्ण माहिती अटी शर्तीसह ग्राम पंचायतच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केले आहे.

**सरपंच** ग्राम पंचायत बाराभाटी — **ग्रामसेवक** ग्राम पंचायत बाराभाटी

## ग्रामपंचायत कार्यालय कोरंभीटोला
### तालुका अर्जुनी/मांर. जिल्हा गोंदिया
### निविदा सूचना क्र. १/२०२४-२५ (पहिली वेळ)

ग्रा.पं. कोरंभीटोला ता.अर्जुनी/मोर. जि. गोंदिया अंतर्गत सन २०२४-२५ या १)१५ वा वित्त आयोग योजनेंतर्गत अ) सेरीकेशन शेड बांधकाम २)१५ वा वित्त आयोग योजनेंतर्गत व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत अ) सार्वजनिक शौचालय बांधकाम-२, हे कामे करण्यासाठी ऑफलाईन दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर निविदा केवळ ऑफलाईन पद्धतीने सादर करावयाची असुन निवीदा बाबत इतर सविस्तर माहिती ग्रा.पं. कार्यालय कोरंभीटोला चे सुचना फलकावर उपलब्ध आहे.

**निविदा वेळापत्रक**

| | | | |
|---|---|---|---|
| १) निविदा प्रसिद्धी | २५/१२/२०२४ | ५)निविदा शुल्क व अनामत रक्कम भरणा करणे | ग्रामपंचायत कोरंभीटोला खाते क्र.97790100016458 बँकेचे नाव-बँक ऑफ बडोदा अर्जुनी/मोर बँकेचे IFSC Code क्र. BARBODBARJN या खात्यावर RTGS/NEFT/Direct Transfer किंवा ग्रामपंचायत कोरंभीटोला येथे रोखीने भरणा करणे |
| २) निविदा ऑफलाईन भरणा | २५/१२/२०२४ ते ०१/०१/२०२५ सायं. ५.०० वा.पर्यंत | | |
| ३) निविदा उघडणे | ग्रा.पं.मासिक सभेत शक्यतो | | |
| ४) निविदा भरणा पूर्व बैठक | नाही | | |

स्वा/- ग्रामसेवक ग्रा.पं.कोरंभीटोला — स्वा/- उपसरपंच ग्रा.पं.कोरंभीटोला — स्वा/- सरपंच ग्रा.पं.कोरंभीटोला

## कार्यालय ग्राम पंचायत चापटी
### पंचायत समिती अर्जुनी/मोर जिल्हा परिषद गोंदिया
### निविदा सुचना

सर्व इच्छूक कंत्राटदारास सुचित करण्यात येत आहे कि, ग्राम पंचायत चापटी ला खालील विवरण पत्राप्रमाणे संपूर्ण कामाची निविदा प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर कामाकरिता बांधकाम विभागाकडे यथा योग्य श्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून मोहरबंद लिफाफा पद्धतीने निविदा दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फार्मची किंमत | अनामत रक्कम (१%) | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | सांडपाणी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शेग्रीकेशन शेड बांधकाम | १२०००० | ५०० | १२०० | ६ महिने |

१) वरील कामाचे निविदा फॉर्म दिनांक २५/१२/२०२४ ला सकाळी ११.०० वाजे पासून ते दि.०१/०१/२०२५ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्राम पंचायत कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल. २) सदर निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागद पत्रासह वरील नमूद कालावधीत ग्राम पंचायत कार्यालयात स्विकारण्यात येईल. ३) सदर कामाचा तपशिलवार संपूर्ण माहिती अटी शर्तीसह ग्राम पंचायतच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केले आहे.

**सरपंच** ग्राम पंचायत चापटी — **ग्रामसेवक** ग्राम पंचायत चापटी

# विदर्भ-मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासाच्या लेखाजोरव्यासह समतोल, सर्वांगिण, विकसित महाराष्ट्राचा आराखडा:मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## हिवाळी अधिवेशनात १७ विधेयके मंजूर

**नागपूर :-** नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात विदर्भ-मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांसह सिंचन, उद्योग, नदीजोड प्रकल्प, पायाभूत सुविधांसारख्या क्षेत्रांबाबत घेण्यात आलेल्या निर्णयांचा लेखाजोखा आणि विकसित, समतोल, सर्वांगिण महाराष्ट्राचा आराखडा मांडण्यात आला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. या अधिवेशनात विविधांगी चर्चेच्या माध्यमातून १७ विधेयके मंजूर करण्यात आली असून जनसुरक्षा विधेयकाबाबत सर्वांना आपले म्हणणे मांडता येण्यासाठी हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर नागपूरच्या विधिमंडळ परिसरातील हिरवळीवर मुखमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत पत्रकार परिषद झाली. या परिषदेस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री शंभूराज देसाई, संजय राठोड, आशिष जयस्वाल, नितेश राणे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आमच्या सरकारने विदर्भ-मराठवाड्याच्या विकासासह शेतकरी, सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे निर्णय घेतले आहेत. या अधिवेशनात मांडलेल्या ३५ हजार ७८८ कोटींच्या पुरवण्या मागण्यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुख्यमंत्री



माझी लाडकी बहीण योजना यासारख्या योजना यापुढेही सुरु ठेवण्यासाठी भरीव निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

आपत्ती बाधीत ५५ हजार संत्रा शेतकऱ्यांना १६५ कोटी रुपये मदत देण्यात आली आहे. कापसाला बोनस देण्यात आला आहे. सोयाबीनची विक्रमी खरेदी करण्यात आली असून १२ जानेवारीपर्यंत ही खरेदी सुरु राहणार आहे. बाजारात कापूस आणि तुरीचे खरेदी दर जास्त असल्याने शेतकरी आपला माल बाजारात विकत आहेत. विविध माध्यमांतून पिकांना सहाय्य करण्यासह शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम सरकार करत असल्याचेही त्यांनी सांगितले.

नागपूर मेट्रो प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी आशियाई विकास बँकेबरोबर प्रकल्प करार करण्यात आला आहे. या प्रकल्पाला ०.७२ टक्के व्याजदराने २० वर्षांसाठी ३५८६ कोटी रुपये अर्थसहाय्य मिळणार आहे. "मित्रा' संस्थेच्या माध्यमातून एक हजार लोकसंख्येवरील गावांना कॉँक्रीट रस्त्याने जोडणे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे बळकटीकरण, बांबू अभियान यासारख्या उपक्रमांना देखील आशियाई विकास बँक मदत करणार आहे, अशी माहितीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, गेल्या अडीच वर्षात सर्वासामान्य माणसांच्या आयुष्यात बदल घडविणारे अनेक निर्णय घेतले आहेत. आता आमची जबाबदारी आणखी वाढली असून सर्वसामान्यांच्या-मायभगिनींच्या प्रगतीसाठी, रक्षणासाठी यापुढेही एक टीम म्हणून काम केले जाणार आहे. या अधिवेशनात नागरिकांच्या, राज्याच्या चौफेर विकासाचा संकल्प करण्यात आल्याने हे अधिवेशन यशस्वी झाले आहे.

## महाराष्ट्र मंत्रिमंडळाचे खातेवाटप

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस : गृह, ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) विधी व न्याय, सामान्य प्रशासन, माहिती व जनसंपर्क, आणि इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विभाग किंवा विषय.

उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे : नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम ( सार्वजनिक उपक्रम)

उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार : वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क.

**कॅबिनेट मंत्री**

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : महसूल

श्री. राधाकृष्ण विखे - पाटील : जलसंपदा (गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ)

श्री. हसन मुश्रीफ : वैद्यकीय शिक्षण

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील : उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य

श्री. गिरीश महाजन : जलसंपदा ( विदर्भ, तापी, कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन.

श्री. गणेश नाईक : वने

श्री. गुलाबराव पाटील: पाणी पुरवठा व स्वच्छता.

श्री. दादाजी भुसे: शालेय शिक्षण.

श्री. संजय राठोड : मृद व जलसंधारण.

श्री. धनंजय मुंडे : अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण.

श्री. मंगलप्रभात लोढा : कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता.

श्री. उदय सामंत : उद्योग, मराठी भाषा

श्री. जयकुमार रावल : पणन, राजशिष्टाचार.

श्रीमती पंकजा मुंडे : पर्यावरण आणि वातावरणीय बदल, पशुसंवर्धन.

श्री. अतुल सावे : इतर मागास, बहूजन कल्याण, दूग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा

श्री. अशोक उईके : आदिवासी विकास.

श्री शंभुराज देसाई : पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण.

ॲड. आशिष शेलार : माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य.

श्री. दत्तात्रय भरणे : क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ.

कु. आदिती तटकरे : महिला व बालविकास.

श्री. शिवेंद्रसिंह भोसले : सार्वजनिक बांधकाम ( सार्वजनिक उपक्रम वगळून).

ॲड. माणिकराव कोकाटे : कृषी.

श्री. जयकुमार गोरे : ग्रामविकास व पंचायत राज.

श्री. नरहरी झिरवाळ : अन्न व औषध प्रशासन , विशेष सहाय्य.

श्री. संजय सावकारे : वस्त्रोद्योग.

श्री. संजय शिरसाट : सामाजिक न्याय.

श्री. प्रताप सरनाईक : परिवहन

श्री. भरत गोगावले : रोजगार हमी, फलोत्पादन, खारभूमी विकास.

श्री. मकरंद जाधव (पाटील) : मदत व पुनर्वसन.

श्री. नितेश राणे : मत्स्यव्यवसाय व बंदरे.

श्री. आकाश फुंडकर : कामगार.

श्री. बाबासाहेब पाटील : सहकार.

श्री. प्रकाश आबिटकर : सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण.

**राज्यमंत्री**

ॲड. आशिष जयस्वाल : वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधि व न्याय, कामगार,

श्रीमती माधुरी मिसाळ : नगर विकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ.

डॉ. पंकज भोयर : गृह ( ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार, खनिकर्म.

श्रीमती मेघना बोर्डीकर : सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम ( सार्वजनिक उपक्रम).

श्री. इंद्रनील नाईक : उद्योग, सार्वजनिक बांधकाम, उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद आणि जलसंधारण.

श्री. योगेश कदम : गृह ( शहरी) महसूल, ग्रामविकास आणि पंचायतराज, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन.

## शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करा-आमदार सुधाकर अडबाले

**गडचिरोली :-** शिक्षकांची नियुक्ती जर विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी झाली आहे, तर शिक्षकांना शिकविण्याचेच काम द्या, त्यांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करा, अशी आग्रही मागणी नागपूर येथे सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनात नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांनी विशेष उल्लेखाद्वारे केली.



राज्यातील शिक्षकांना प्रत्यक्ष शिक्षणाव्यतिरिक्त (जनगणना व निवडणूक वगळता) कोणतेच अशैक्षणिक कामे शिक्षकांना देण्यात येऊ नये, अशी RTE-२००९ मध्ये तरतूद आहे. परंतु, सतत चालणाऱ्या मतदार नोंदणी व इतर सर्वेक्षण प्रक्रियेत शिक्षकांना गुंतवून अशैक्षणिक कामे दिली जात असल्याने राज्यातील शिक्षकांत तीव्र असंतोष आहे. आधीच राज्यात शिक्षकांची हजारो पदे रिक्त असल्याने मराठी शाळांचा दर्जा खालावत चालला आहे. शाळांचा दर्जा उंचाविण्यासाठी शिक्षकांना अधिक वेळ द्यावा लागणार आहे. असे असताना त्यांना अशैक्षणिक कामे दिली जात आहे. काही शिक्षकांना तर वर्षभर अशैक्षणिक (बी.एल.ओ.) कामे दिली जात आहे.

शिक्षकांची नियुक्ती जर शिकविण्यासाठी झाली आहे तर शिक्षकांना शिकविण्याचेच काम करू द्यावे. अवांतर कामांचा बोझा शिक्षकांवर लादू नका. त्यामुळे गुणवत्तेत परिणाम होत असतो. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दि. २३ ऑगस्ट २०२४ नुसार शैक्षणिक व अशैक्षणिक कामांच्या वर्गीकरणाबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. या शासन निर्णयानुसार जनगणना, आपत्ती निवारणाची कामे व निवडणुकांची कामे ही कामे वगळता इतर सर्व अशैक्षणिक कामांतून तात्काळ सर्व शिक्षकांची मुक्तता करावी व सदर शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत सर्व अधिकारी यांना निर्देश देण्यात यावे, अशी आग्रही मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी विशेष उल्लेखाद्वारे केली.

## नागपूर येथे पाली भाषेचे विद्यापीठ व्हावे-आ.राजकुमार बडोले

**नागपूर:-** महाराष्ट्र विधानसभेचे हिवाळी अधिवेशन दरम्यान राज्याचे माजी मंत्री आणि अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार राजकुमार बडोले यांनी विधानसभेत महामहीम राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर होणा?्या चर्चेत सहभाग घेत माननीय राज्यपाल महोदयांचे आभार व्यक्त केले. दरम्यान त्यांनी प्रगत महाराष्ट्र घडविण्याच्या दृष्टीने महाराष्ट्राला स्वच्छ व निर्णयाभीमुख प्रशासन राज्याला मिळेल यात शंका नसल्याचे मत व्यक्त करत राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात मांडलेल्या विविध मुद्द्यांचा उहापोह त्यांनी विधानसभेत आवर्जून केला.

केंद्र शासनाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला यामुळे ४५० विद्यापीठांमध्ये मराठी भाषेचा अभ्यास करण्यासाठी विशेष केंद्र स्थापन करण्यास मदत होणार आहे. मराठी भाषेचे संवर्धन आणि जतन करण्यासाठी केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध होईल यासाठी शासनाचे आभार राजकुमार बडोले यांनी मानले मात्र याचसोबत याचसोबत पाली,





आसामी आणि बंगाली भाषेला सुद्धा अभिजात भाषेचा दर्जा केंद्रसरकारने दिल्याबद्दल अभिनंदन केले. संपूर्ण जगात बौद्ध तत्त्वज्ञान प्राकृत पाली भाषा भारतीय संस्कृतीच्या मुळाशी आहेत. या अध्यात्म ज्ञान आणि तत्त्वज्ञान च्या भाषा आहेत. याचे संवर्धन आणि जतन करण्यासाठी तसेच या भाषांचे अध्ययन करण्यासाठी नागपूर येथे पाली भाषेचे विद्यापीठ व्हावे अशी मागणी राजकुमार बडोले यांनी विधानसभेत केली.

## जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह गारपीट होण्याची शक्यता!

**पुणे**-राज्यात अवकाळी पाऊस वारंवार हजेरी लावत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. अशातच आता हवामान विभागाने तीन दिवस राज्यात वादळी वाऱ्यासह गारपिट होण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा शेतकऱ्यांचं टेन्शन वाढलं आहे. मान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा सक्रीय पट्टा तयार झाला आहे. त्यामुळे अरबी समुद्रात देखील आर्दता वाढली आहे. मात्र आता त्याचा परिणाम राज्यातील मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात दिसून येणार आहे. कारण राज्यातील या भागात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवली आहे. २६ आणि २८ डिसेंबरदरम्यान जोरदार पावसाची शक्यता आहे.

## वाहतूक शाखेची २८१ दुचाकी वाहनांवर कारवाई, २ लाख ६६ हजाराच दंड

**गोंदिया :-** जिल्ह्यात वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या २८१ वाहन चालकांवर जिल्हा वाहतूक शाखा,रामनगर,शहर व ग्रामीण पोलिसांच्या संयुक्त कार्रवाईमध्ये कारवाई करुन १०३ वाहन जप्त करण्यात आली.या वाहन चालकांवर २ लाख ६६ हजार ७५० रुपयांचा दंड ठोठवण्यात आल्याची माहिती आज २१ डिसेंबरला जिला वाहतुक शाखेत आयोजित पत्रपरिषदेत उपविभागीय पोलीस अधिकारी रोहिणी बानकर यांनी दिली. यावेळी परिविक्षाधिन उपविभागीय पोलीस अधिकारी महेर,वाहतुक शाखेचे प्रभारी पोलीस निरिक्षक नागेश भाष्कर,सहायक पोलीस निरिक्षक राहुल पाटील उपस्थित होते. पोलीस अधिक्षक व अप्पर पोलीस अधिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्या दुचाकी स्वारांवर विशेष मोहिमे अंतर्गत मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली आहे. तसेच यापुढेही वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहन चालकांवर



जिल्हा वाहतुक शाखेतर्फे संपुर्ण जिल्हयात वेळोवेळी कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक नागेश भास्कर यांनी नागरिकांना वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत आवाहन केले आहे. सदरची विशेष मोहीमे दरम्यान सपोनि राहुल पाटील जिल्हा वाहतुक शाखा गोंदिया, सपोनि गेडाम पो. स्टे. गोंदिया शहर, महिला पोलीस उपनिरीक्षक शेख पो. स्टे. गोंदिया ग्रामीण, महिला पोलीस उप निरीक्षक नेहे पो. स्टे. रामनगर, पोलीस उपनिरीक्षक बागुल पो. स्टे. रावणवाडी तसेच पेट्रोलिंग पथकातील सफौ रविंद्र भुरे व जिल्हा वाहतुक शाखेतील संपुर्ण पोलीस अंमलदार यांनी या कारवाईत प्रत्यक्ष सहभाग घेवुन वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर उत्कृष्टरीत्या कारवाई केलेली आहे.

## आठ लाखांचे बक्षीस असलेल्या दोन नक्षलवाद्यांचे अहेरीत आत्मसमर्पण

**गडचिरोली :-** तब्बल ३० वर्षांपासून नक्षल चळवळीत काम करणाऱ्या आणि एरिया कमिटी मेंबर (एसीएम) पदावर कार्यरत असलेल्या रामसु दुर्गु पोयाम ऊर्फ नरसिंग (५५ वर्ष) याने आत्मसमर्पण केले. त्याच्यासोबत छत्तीसगडमधील दलम सदस्य असलेल्या रमेश शामू कुंजाम उर्फ गोविंद उर्फ रोहित (२५ वर्ष) यानेही जिल्हा पोलीस आणि सीरआरपीएफ दलापुढे अहेरीतील प्राणहिता पोलीस उपमुख्यालयात आत्मसमर्पण केले. अनेक गंभीर गुन्ह्यात सहभाग असलेल्या रामसु याच्यावर ६ लाखांचे तर रमेश याच्यावर २ लाखांचे ईनाम शासनाने ठेवले होते.

रामसु ऊर्फ नरसिंग हा धानोरा तालुक्यातील गट्टानेली येथील रहिवासी आहे, तर रमेश ऊर्फ गोविंद ऊर्फ रोहित हा छत्तीसगडच्या नारायणपूर जिल्ह्यातील वेडमेट्टा येथील रहिवासी आहे.

रामसु ऊर्फ नरसिंग पोयाम हा सन १९९२ मध्ये टिपागड दलममध्ये सदस्य पदावर भरती होऊन सन १९९५ पर्यंत कार्यरत होता. त्यानंतर काकुर दलममध्ये १९९६ पर्यंत माओवाद्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमांना सुरक्षा देण्याचे काम करीत होता. सन १९९६ ते १९९८ पर्यंत पुन्हा टिपागड दलममध्ये कार्यरत होता. सन १९९८ मध्ये माड एरिया (छ.ग.) येथे बदली होऊन पुरवठा टिममध्ये २००१ पर्यंत कार्यरत होता. सन २००१ ते २००२ पर्यंत प्रेस टिममध्ये प्रशिक्षणाकरीता कार्यरत होता. सन २००२ मध्ये एरीया कमिटी मेंबर (एसीएम) पदावर पदोन्नती होऊन माओवाद्यांसाठी कृषी कामाकरीता कोडतामर्का गाव परिसरात सन २००५ पर्यंत कार्यरत होता. सन २००५ ते २०१० या कालावधीत मौजा डुमनार, फरसगाव व कोडेनार या गावांमध्ये माओवाद्यांसाठी कृषीची कामे करत होता. सन २०१० ते आजपावेतो कुतुल आणि नेलनार दलममध्ये एरिया कमिटी मेंबर (एसीएम) पदावर कार्यरत होता. रामसु ऊर्फ नरसिंग याच्यावर आजपर्यंत १२ गुन्हे दाखल आहेत. त्यामध्ये ६ चकमकी, ५ हत्या व एका दरोड्याचा समावेश आहे.

रमेश ऊर्फ गोविंद ऊर्फ रोहित हा सन २०१९ मध्ये मिलिशिया म्हणून माओवाद्यांची कामे करत होता. सन २०२० मध्ये चेतना नाट्यमंच (सीएनएम) येथे सदस्य पदावर भरती झाला. सन २०२१ मध्ये कुतुल दलममध्ये सदस्य पदावर भरती होऊन आतापर्यंत कार्यरत होता. त्याच्या हिंसक घटनांमधील सहभागाची पडताळणी करणे सुरु आहे.





### आत्मसमर्पित होण्याची कारणे

**गडचिरोली पोलीस दलाच्या आक्रमक नक्षलविरोधी अभियानामुळे त्यांचे कंबरडे मोडले आहे. सोबतच्या सदस्यांना पोलिसांकडून अटक करण्यात आल्याने व घरातील सर्व सदस्य तथा नातेवाईकांनी आत्मसमर्पण करण्यासाठी प्रवृत्त केल्यामुळे यांनी आत्मसमर्पणाचा मार्ग पत्करला. वरिष्ठ माओवादी नेते फक्त स्वत:च्या फायद्यासाठी गरीब आदिवासी युवक-युवतींचा वापर करून घेतात यामुळे नक्षल चळवळीतील सदस्यांचे मनोबल खचले आहे.**

### वर्षभरात २० जणांचे आत्मसमर्पण

**वर्ष २०२४ मध्ये आतापर्यंत २० माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. याशिवाय सन २०२२ ते आतापर्यंत एकुण ३३ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले. त्यात अनेक जहाल माओवाद्यांचा समावेश आहे. ही कारवाई विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) संदीप पाटील, उपमहानिरीक्षक अंकित गोयल, सीआरपीएफचे पोलीस उपमहानिरीक्षक (अभियान) अजय कुमार शर्मा, पोलीस अधीक्षक नीलोत्पल, सीआरपीएफचे प्रभारी समादेशक सुजीत कुमार (३७ बटालियन) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली.**

## रेल्वेगाड्यांच्या थांब्यांसह कामांना गती देण्यासाठी रेल्वेमंत्री वैष्णव यांना पत्र

**गोंदिया:-** गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.नामदेवराव किरसान यांनी मतदारसंघातील रेल्वेविषयक समस्यांना व रेल्वेगाड्याच्या थांबा मिळण्यासंदर्भात आज संसद भवनात रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेत वडसा ते गडचिरोली रेल्वे प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी केली.




तसेच छत्तीसगड ते गडचिरोली रेल्वे लाईन भविष्यात करण्याच्या अनुषंगाने नकाशा घेऊन चर्चा केली.यावेळी मतदारसंघातील वडसा रेल्वे स्टेशनवर गाडी क्र. २२१७३ व २२१७४ जबलपूर ते चांदा फोर्ट व चांदा फोर्ट ते जबलपूर,गाडी क्र. ०७०५१ व ०७०५२ हैद्राबाद ते रकसौल व रकसौल ते हैद्राबाद या रेल्वे गाड्यांचा थांबा देण्याची मागणी केली. तर मतदारसंघातीलच आमगाव रेल्वेस्थानक येथे गाडी क्र. १२०६९ व १२०७० रायगड ते गोंदिया व गोंदिया ते रायगड जनशताब्दी एक्सप्रेसचा थांबा देण्यासंदर्भातील निवेदन दिले.

## १५ वर्षांपासून धरणग्रस्त ११४ शेतकरी मोबदल्याच्या प्रतीक्षेत

**सालेकसा :-** तालुक्यातील देवछाया उपसा जलसिंचन योजनेकरिता २००९ मध्ये कोटरा येथील ११४ शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या. या घटनेला १५ वर्षांपेक्षा अधिक कालावधी लोटला; परंतु अद्याप शेतकऱ्यांना मोबदला मिळाला नाही. त्यामुळे त्यांनी लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय यंत्रणेवर नाराजी व्यक्त केली.

सालेकसा हा आदिवासीबहुल, नक्षलग्रस्त तालुका आहे. या तालुक्यात आजही जवळपास ७० ते ८० टक्के शेतकरी शेतीवर अवलंबून आहेत. कोटरा, कोसोटोला, हलबीटोला, पुजारीटोला धरण हे प्रसिद्ध आहेत. अशातच देवछाया उपसा जलसिंचन योजनेकरिता १७ ऑगस्ट २००९ मध्ये कोटरा येथील ११४ शेतकऱ्यांच्या शेतजमिनी संपादित करण्यात आल्या.



जमिनीचा मोबदला आज, उद्या मिळेल. या आशेवर शेतकरी होते. परंतु आश्वासनापलीकडे त्यांना काहीही मिळाले नाही. प्रशासन आणि लोकप्रतिनिधीदेखील उडवाउडवीची उत्तरे देतात, असा आरोप शेतकऱ्यांचा आहे. या शेतकऱ्यांनी आमदार, खासदार यांच्यासह पालकमंत्री, जिल्हाधिकारी, मंत्रालयाचे सचिव, कार्यकारी अभियंता, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, जलसंधारण कार्यालय, जिल्हा भूसंपादन विभाग यांना अनेकदा पत्रव्यवहार केले. शासकीय कार्यालयाच्या चकरा मारल्या. मात्र जमिनीच्या मोबदल्याबाबत कोणीही बोलायला तयार नाहीत. १५ वर्षांत कित्येक अधिकारी बदलून गेले असतील, परंतु फाइल बदलत नाही. किंवा बदलून गेलेले अधिकारीसुद्धा फाइलसोबत नेत नाही, अशी खंत व्यक्त करीत शेतकऱ्यांनी कार्यरत अधिकारीसुद्धा तेवढेच जबाबदार असल्याचाही आरोप केला. तथापि, जमिनीचा मोबदला लवकरात लवकर न मिळाल्यास आंदोलन करण्याचा इशारा आत्माराम भांडारकर, हरिश्चंद्र डोये, किशोर मडावी, रमेश भुते, छबीलाल धुर्वे, प्रल्हाद मडावी, अशोक मडावी, टेमलाल मडावी, राधेशाम मडावी यांनी दिला आहे.

## पीक कर्जासाठी आता नमुना '८-अ' आवश्यक; शेतकऱ्यांना मिळणारे पीककर्ज कमी होणार

**गोंदिया :** नमुना 'आठ-अ' या शेतजमिनीच्या मालकी उताऱ्यावर शेतकऱ्याच्या वाट्याला जेवढे क्षेत्र असेल तेवढ्याच क्षेत्राचे पीककर्ज यावर्षीपासून मिळणार आहे. त्यामुळे गावपातळीवरील सेवा सोसायट्यांतून प्रत्येकाचे 'आठ-अ' जमा करण्याची मोहीम जिल्ह्यात जोरात सुरू आहे.

'आठ-अ'चा निकष लावल्याने शेतकऱ्यांना मिळणारे पीककर्ज कमी होणार आहे. बहुतांश शेतकरी असे आहेत की, त्यांच्या 'आठ-अ'वर एकत्रित कुटुंबातील सर्वांची नावे आहेत. ती हक्क सोडपत्र केल्याशिवाय कमी होणार नाहीत. 'नाबार्ड'च्या सूचनेमुळे शेतकऱ्यांवर हे नवेच संकट आले आहे. आतापर्यंत जो शेतकरी सेवा संस्थेला सभासद आहे. त्याच्या उताऱ्यावर जेवढे क्षेत्र आहे, तेच विचारात घेऊन त्याला पीककर्ज मंजूर केले जात होते. गत अनेक वर्षांपासून हीच पद्धती सर्वत्र लागू आहे. हे कर्ज वसूल होण्यातही फारशी कधी अडचण आलेली नाही; परंतु मनाबार्डने पीककर्ज वाटपाचे निकष बदलले आहेत. त्यानुसार यावर्षीपासून पीककर्ज वाटप होणार आहे.

एकत्र कुटुंबपद्धतीत कुटुंबातील कर्त्या पुरुषाचे निधन झाल्यावर त्याच्या वारसांची नावे शेतजमिनीला वारसा हक्काने लागतात. त्यात त्या कर्त्या पुरुषाची पत्नी, मुले व मुली अशा सर्वांची नावे लागतात. पीककर्ज देताना सेवा संस्थेला जो सभासद आहे, त्याच्या नावावर त्या 'आठ-अ'वरील सर्वच क्षेत्र विचारात



घेऊन पीककर्ज वाटप केले जात होते. आता तसे होणार नाही. समजा एका शेतकऱ्याला ३ एकर म्हणजे १२० गुंठे क्षेत्र असेल आणि त्याचे निधन झाल्यावर पत्नी, वाट्याला फक्त १७ गुंठेच जमीन येऊ शकते. त्यामुळे त्याला तेवढ्याच क्षेत्राचे पीककर्ज मिळेल.

**सेवा सहकारी संस्था अडचणीत**

या नियमामुळे सेवा संस्थांच्या एकूण पीककर्ज वाटप किमान ४० टक्के कमी होण्याची शक्यता सेवा संस्थांतील पदाधिकारी व्यक्त करीत आहेत. तसे झाल्यास या संस्था चालवायच्या कशा? असा प्रश्न उपस्थित होतो. यादरम्यान कृषी पतपुरवठ्याची ही महत्त्वाची व्यवस्थाही अडचणीत येणार आहे.

**हक्कसोड पत्र जोडावे लागणार**

वारसा हक्काने शेतजमिनीला लागलेली बहिणी, पत्नीचे नाव कमी करायची झाल्यास त्यांचे हक्क सोडपत्र करावे लागेल. पूर्वी काहीवेळा त्यांचे संमतिपत्र घेऊन पीककर्ज मंजूर केले जात होते; परंतु आता ते अजिबात चालणार नाही, अशी बँकेची नोटीस सेवा संस्थांनी लावली आहे. हक्क सोडपत्र करणे ही सोपी गोष्ट नाही. कारण बहिणीही आता संपत्तीत वाटा मागू लागल्या आहेत. त्यावरून अनेक कुटुंबांत कमालीचे वाद सुरू आहेत.